सयाम, तिबेट, पाकिस्तान, अफगाणिस्तान इ. ठिकाणी बौद्ध स्तूप आणि बौद्ध अवशेष सापडलेले आहेत. बौद्ध धर्माची उत्पत्ती आणि प्रसार भारतात झाल्याने भारतीय स्तूप सर्वांत प्राचीन आहेत. सम्राट अशोकाने निरनिराळ्या पवित्र बौद्धस्थळी ८४,००० स्तूप बांधल्याचा उल्लेख बौद्ध वाङ्मयात मिळतो. बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबरच छोटे छोटे स्तूप धर्मकृत्याचाच एक भाग आहे, अशी भाविकांत समजूत झाल्याने अनेक ठिकाणी असे शेकडो स्तूप बांधलेले आढळून आले आहेत. भारतात मौर्य कालापासून ( इ. स. पू. तिसरे शतक ) ते इ. स. बाराव्या शतकापर्यंत स्तूपांची बांधणी होत होती. पुढे त्यात खंड पडला आणि पुन्हा विसाव्या शतकात काही ठिकाणी त्यांची नव्याने बांधणी झाली व काही जीर्णशीर्ण झालेल्या स्तूपांची पुनर्बांधणी करण्यात आली.

स्तूपाची बांधणी वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यांचे विटांत बांधलेले प्रतिवेष ( दगडबंदी ) घुमट हे पूर्णतः अर्धवर्तुळाकार असून ते वर्तुळाकार पायावर बांधलेले आहेत. चौथऱ्यावर बांधलेल्या या भरीव घुमटाला ‘अण्ड’ अशी संज्ञा दिली जाते. त्याचा अश्मास्थीवरील छत्रीवजा चबुत्रा ठेंगणा असून त्याभोवती कठडा वा वेदिका कुसू व खोबणीद्वारे एकत्र सांधलेल्या असतात. तिच्या मध्यावर एक स्तंभ असून त्यावर ‘ छत्र ’ असते. स्तूपा-भोवती ‘ प्रदक्षिणापथ ’ असतो आणि त्याभोवती कुंपण ( वेदिका ) असते. स्तूपावर पेटीसारखे आसन आणि त्यावर छत्र तयार केलेले असे. हे सम्राटाचे लक्षण होय.

स्तूपांच्या रचनेतील वैशिष्ट्यांवरून त्याचा काल सर्वसाधारणपणे ठरविता येतो. आधीच्या कालातील स्तूपाचे अण्ड बसके, तर नंतरच्या कालातील अण्ड जास्त उंच आढळून येतात. त्याचप्रमाणे उत्तरकालातील स्तूप अनेक चौथऱ्यांवर बांधलेले व अनेक छत्र असलेले आढळतात. पूर्वकालातील स्तूप साध्या बांधणीचे, तर उत्तरकालातील स्तूप नक्षीने सजविलेले असल्याने वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. उत्तरकालातील भारताबाहेरील प्रदेशांतील स्तूप त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण उंच निमुळत्या छत्रावलीमुळे काहीसे वेगळे वाटतात.

भारतातील पिप्रावा ( उत्तर प्रदेश ) व वैशाली ( बिहार ) येथे सापडलेले स्तूप बुद्धसमकालीन असावेत, असे एक मत आहे. सांची, सारनाथ आणि तक्षशिला येथील धर्मराजिका स्तूप अशोकाने प्रथम बांधले अशी परंपरा सांगते. सांचीचा स्तूप भव्य आहे परंतु याची डागडुजी, विस्तृतीकरण व प्रवेशद्वाराची बांधणी शुंगकालात झाली. जयपूरजवळील वैराट येथेही मौर्यकालीन स्तूपाचे अवशेष मिळाले आहेत.

मध्यभारतातील भारहूत, सांची तसेच बोधगया, कुमरहार येथील अपोत्थित स्तूपांचे अवशेष उत्कृष्ट शिल्पांसाठी प्रख्यात आहेत. दक्षिणेतही अमरावती, नागार्जुनकोंडा, जग्गय्यपेट, घण्टाशाला, गुडिवाडा, भट्टिप्रोळू येथील स्तूपावशेष अपोत्थित शिल्पासाठी प्रख्यात आहेत. यांचा काल इ. स. पू. पहिले शतक ते इ. स. तिसरे शतक असा असून वैशिष्ट्यपूर्ण बांधणी, उत्कृष्ट मूर्तिशिल्प व शुद्ध चुन्याचा वापर यांमुळे ते प्रख्यात आहेत. ते अनेक चौथऱ्यांवर बांधलेले, अनेक निमुळत्या छत्रांचे व कमी परिघाच्या अनेक अण्डांचे बांधलेले आढळतात. गांधार स्तूपावर ग्रीकांश वास्तूशैलीची छाप आढळते. बुद्ध-बोधिसत्त्वादिकांच्या अनेक मूर्ती यांच्याशी संलग्न आहेत. पेशावरजवळील शाहजीकी ढेरी येथील कनिष्काचा स्तूप प्रख्यात आहे. कुशाणकालीन जैन स्तूपाचे अवशेष मथुरेस सापडले आहेत. सारनाथ येथील धमेख ( धर्माख्य ) स्तूप त्याच्या उंच अण्डाबद्दल व उत्कृष्ट कोरीव कामाबद्दल प्रसिद्ध असून तो गुप्तकालीन आहे.

बृहद्भारतातील स्तूप अनेक चौथरे व निमुळत्या छत्रावलीमुळे प्रसिद्ध आहेत. तिबेट, नेपाळ, म्यानमार, सयाम, कंबोडिया व इंडोनेशियात असे स्तूप असून ते बहुधा गुप्तकालानंतरचे आहेत. नेपाळमधील पाटणचा स्वयंभूनाथ स्तूप, श्रीलंकेमधील ( अनुराधपुर ) थूपाराम डागोबा, रूवनवेली इ. स्तूप आणि जावामधील बोरोबूदूरचा स्तूप उल्लेखनीय आहेत.

**अमरावती :**

बौद्ध अवशेषांचे एक स्थळ. हे आंध्र प्रदेशात गुंतूरपासून ३४ किमी.वर कृष्णेच्या दक्षिणकाठी वसले आहे. प्राचीन काळी ह्यास ‘धरणिकोट’ किंवा ‘धान्यकटक’ असे म्हणत. एका प्रचंड बौद्धस्तूपासाठी अमरावती प्रसिद्ध असली,

तरी तो संपूर्ण स्तूप आज अस्तित्वात नाही. १७९७ साली एका स्थानिक जमीनदाराने घराच्या बांधकामासाठी स्तूपावरील अनेक संगमरवरी शिल्पपट्ट उद्‌ध्वस्त केल्यामुळे सध्या तेथे केवळ स्तूपाचा आलेख व काही शिल्पे पाहावयास सापडतात. १८८० साली झालेल्या उत्खननांत अनेक महत्त्वाचे अवशेष व काही शिलालेखही सापडले. त्यांपैकी बरेच चांगले नमुने ब्रिटिश वस्तुसंग्रहालयात व मद्रास वस्तुसंग्रहालयात हलविण्यात आले. त्यानंतर अलीकडे भारत सरकारच्या पुरातत्त्वखात्यानेही तेथे उत्खनन केले आणि तेथे सापडलेल्या वस्तू नागार्जुनकोंडा येथील वस्तुसंग्रहालयात ठेवल्या आहेत.

येथील मुख्य स्तूप संगमरवरी दगडांच्या चिपांनी आच्छादिलेला होता त्याभोवती दोन प्राकार होते. बाहेरच्या जास्त प्राचीन असून त्याची उंची जमिनीपासून ३।।-४ मी. होती. स्तूपाचा उत्तरभाग व दोन्ही प्राकारांचे सर्व संगमरवरी दगड उठावदार नक्षीकामाने भरलेले होते. स्तूपाचा व्यास सु. ४९ मी., आतील कठड्याचा परीघ १५८ मी. व बाहेरील कठड्याचा परीघ २४५ मी. होता. बाहेरच्या कठड्यावर व आतील बाजूसही हजारो सुंदर आकृत्या असल्या पाहिजेत, असा पुरातत्त्ववेत्त्यांचा अंदाज आहे. जोत्यांवर प्राण्यांची व मुलांची चित्रे आहेत. येथील शिल्पाकृतींत काही वेळा बुद्ध एखाद्या पक्ष्याच्या वा प्राण्याच्या रूपात दाखविलेला आढळतो तर काही ठिकाणी तो केवळ चिन्हांनी चित्रित केलेला दिसतो. शिल्पांतून बुद्धाच्या जीवनातील प्रसंग, जातककथा आणि स्तूपांच्या प्रतिकृती प्रामुख्याने आढळतात. काही ठिकाणी मानवाकृति-शिल्पांची रेलचेल आढळते. शिल्पांतील मानवाकृती सडपातळ व भावपूर्ण दिसतात. शिल्पांतून बुद्धाची अनेक प्रतीके आहेत परंतु बुद्धाची संपूर्ण अशी प्रतिमा एखादीच आढळते.

अमरावतीच्या पाषाण-शिल्पांचा काळ गांधारशैली व सांचीशैली ह्यांच्या मधला असावा. अमरावतीशैली, मथुरा शैली आणि गांधार शैली यांच्या सुमारास भरभराटीत असावी, असेही काहींचे मत आहे. अलीकडे येथील शैलीविषयी इ.स.पू. २०० ते इ.स. २०० ही सर्वसाधारण कालमर्यादा मानण्यात आली आहे. बाहेरचा प्राकार इ.स.पू. पहिल्या शतकाच्या अखेरीत बसविला असावा, असे पुलुमाई (वी) व यज्ञश्री ह्या सातवाहन राजांच्या अर्पणलेखांवरून उघड होते. अमरावतीशैलीवर परकीय शिल्पकलेची छाप दिसत नाही मात्र काही शिल्पाकृतींतील ज्ञापके वा उपमानक ग्रीक-रोमन वाटतात. नंतरच्या दक्षिणेतील अनेक शिल्पाकृतींवर अमरावतीशैलीची छाप आढळतो एवढेच नव्हे, तर अजिंठा-चित्रशैलीवर, तसेच इंडोचायनातील शिल्पांवरही ती पडली आहे. ‘‘सर्व भारतीय शिल्पांत अमरावतीइतके नाजुक व विलासमय शिल्पपुष्प दुसरे नाही’’ हे कुमारस्वामींचे मत यथार्थ वाटते.

**भारहूत :**

बौद्ध अवशेषांसाठी प्रसिद्ध असलेले, मध्य प्रदेशातील एक प्राचीन स्थळ. ते बाघेलखंडात पूर्वीच्या नागोद संस्थानात सटना या रेल्वे स्थानकाच्या दक्षिणेस सु. ११ किमी. वर आहे. या ठिकाणी मौर्यकाळात (इ. स. पू. ३२२-१८५) एक स्तूप बांधण्यात आला. नंतर शुंगकाळात या स्तूपाभोवती प्राकार, कठडे व तोरण- दरवाजे बांधण्यात आले. सद्यस्थितीत तिथे फक्त काही तुरळक अवशेषच इतस्ततः विखुरलेले आढळतात. येथील स्तूपाचे अवशेष अलेक्झांडर कनिंगहॅम या संशोधकाच्या दृष्टीस पडले (१८७३). त्या वेळी त्याला येथील अनेक अवशेष घराच्या बांधकामासाठी नागरिकांनी वापरलेले आढळले. त्यांतील महत्त्वाचे व उल्लेखनीय अवशेष गोळा करून त्याने ते कलकत्याच्या ‘ इंडियन म्यूझियम ‘ मध्ये पुरातत्वीय दालनात ठेवले (१८७५). त्यानंतर भारतीय पुरातत्वीय खात्याने उर्वरीत अवशेषांचा शोध घेऊन ते अलाहाबाद व मुंबई येथील वस्तुसंग्रहालयांत हलविले. अगदी अलीकडे उपलब्ध झालेले काही अवशेष दिल्ली येथील राष्ट्रीय संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत.

भारहूतचा मूळ स्तूप विटांत बांधला असून कठडे (वेदिका) व तोरणे यांचे बांधकाम वालुकाश्मात केले आहे. स्तूपाचा व्यास सु.२१ मी. होता आणि त्याचा उंचीचा आकार अंडाकृती असून चारी बाजूंस भव्य द्वारे होती. द्वारांच्या बाजूंच्या स्तंभात रक्षक म्हणून (१.३३ मी. उंचीच्या) यक्ष-यक्षिणी व नागराज यांची अपोत्थित मूर्तिशिल्पे खोदली होती. प्रत्येक वेदिकेला १६ स्तंभ असून या एकूण ६४ स्तंभावर, तारणांवर व वेदिकांवर विपुल शिल्पांकन आहे. त्यात बुद्धजीवन व जातककथा यांतीत विविध प्रसंगाचे प्रतीकात्मक शिल्पन केले असून बुद्धाची मुर्ती न घडविता त्याचे

प्रतीकारत्मक दर्शन घडवावे या हेतूने हत्ती, घोडा, वृषभ व कमळ ही गौतमाच्या जन्माची बद्ध अशी प्रतीके खोदला आहेत. धर्मचक्र, त्रिरत्न, बोधिवृक्ष, स्तूप, पदयुग्म इ. प्रतीकांची पूजा आणि बुद्धपूर्ण अवतार व त्यांची लांच्छने असलेले वृक्ष दाखविलेले आहेत. बोधिवृक्ष हे ज्ञानप्रातीचे, धर्मचक्र हे पहिल्या उपदेशाचे व स्तूप हे महानिर्वाणाचे प्रतीक होय. या प्रतीकांबरोबर इतर पशुपक्षी फळे, फुले, पाने, वेलबुट्ट्या, झाड यांचेही शिल्पांकन आहे. येथे जातककथांतील प्रसंगांबरोबरच तीरशिल्पांत व स्तंभांवर यक्ष, यक्षी, नागराज, शालभंजिका, पूजा करणारे भक्त यांच्या मुर्ती आढळतात. काही शिल्पांतून तत्कालीन राजांच्या भेटीची दृश्ये आहेत. या विविध शिल्पांतील मायादेवीचे स्वप्न, बोधिवृक्षाची पूजा, कुरंग मृग व सरू जातक, राजा अजातशत्रू व प्रसेनजित यांची बुद्धाबरोबर भेट, धर्मचक्र-पुजा, कुलकोक, सुदर्शना, चंद्रा या यक्षींच्या मुर्ती, मयुर-पदक, फेटाधारी पुरूषाचे पदक अशी काही शिल्पे असून ती सुरेख आहेत.

येथील बुद्धजीवनाचे कथानक सुसंगत असून चित्रपटाप्रमाणे ते सलग दर्शविले आहे. बुद्धाचे गमन त्याच्या पावलांच्या प्रतीमांतून उमटते तर कंथक घोड्याच्या एकसारख्या प्रतिमांतून त्याच्या पुढील भरारीची प्रगती दृष्टोत्पत्तीस येते. या कथानकाच्या प्रसंगांखाली शिलालेख असून त्यांत त्या त्या प्रसंगाचे चित्रवर्णन दिले आहे आणि ते शिल्प दान देणाऱ्याचे नावही खोदले आहे. बौद्ध साहित्यातील, विशेषतः जातककथांतील प्रसंगाचे चित्रवर्णनांसह शिल्पांकन असलेले भारहूप स्तूप हे भारतीय वस्तुशैलीच्या इतिहासातील एकमेक उदा. हरण आहे. अशी वर्णनात्मक लेख असलेली शंभर शिल्पे आतापर्यंल येथे उपलब्ध झाली आहेत.

भारहूतची शिल्पशैली बौद्ध कलेच्या इतिहासातील संक्रमणावस्था दर्शविते. येथे आर्ष शैलीतील शिल्पापर्यंतच्या सर्व अवस्थांतील विकासाची स्थित्यंतरे स्पष्टपणे दृग्योचर होतात. शुंगकाळातील शिल्पे रेखीव, धारदार व उठावदार आहेत. सिरिमा देवता व कुलकोक देवता (यक्षी) ही यांची उत्कृष्ट उदाहरणे होत. दोन्ही मुर्तीच्या घडणीत वर्तूलन म्हणजे वाटोळेपणा असला तरी पहिली मुर्ती उदास संथ व रूक्ष वाटते. इथे उत्तान स्तन व विशाल नितंब यांवर अवास्तव भर दिला आहे मुर्तीची लय साधणारी वक्ररेषा कुठेच दिसत नाही. मात्र कुलकोल यक्षीची दुसरी मुर्ती अत्यंत कमनीय असून शरीर घाटदार आहे. ती त्रिभंग अवस्थेत वृक्षाच्या सानिध्यात असून उजव्या हाताने तिने फांदी पकडली आहे व डाव्या हाताने ती खोडाला कवटाळीत आहे. सांची येथील यक्षींप्रमाणे तिची वक्षस्थळे पुष्ट व नितंब विशाल असूनही तिच्यात उत्तानपणा व मादकता यांचा अंश आढळत नाही. घाटदार, शरीर, रेखीवपणा आणि वक्ररेषांमुळे आलेली गतिमानता यामुंळे ती आकर्षक वाटते. येथील मुळ स्तूपाचे बांधकाम मौर्यकाळात सम्राट अशोकाच्या वेळी (इ. स. पू. २७३-२३२) झाले आणि तोरण-दरवाजे, कठडे आदींचे बांधकाम शुंगकाळात (इ. स. पू. १८५-७५) पूर्ण झाले. येथील एका तोरणावर ब्राह्मी लिपित एक कोरीव लेख आहे. त्यात हे तोरण शुंग वंशातील धनभूती राजाने बांधल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. याशिवाय इतर तोरणांवरही लेख असून तिचे दान देणाऱ्यांची नावे आहेत. मौर्यकाळापासून शुंगकाळाच्या अखेरीपर्यंत याचे बांधकाम चालू होते. त्यावरून भारहूत शिल्पशैलीचा काळ सर्वसाधारणतः इ. स. पू. २५०-१०० या दरम्यान मानण्यात येतो.

भारहूतची शिल्पकला ही पूर्णतः एकद्देशीय व अभिजात आहे. शिल्पांत त्रिमितिदर्शक उठावदार शिल्पे तुलनात्मक दृष्टया फार नाहीत. बहुतेक शिल्पांकन अपोत्थित असून मौर्य-शुंगकाळातील ओबडधोबडपणाची छटाही अधूनमधून त्यांत स्पष्टपणे दिसते. लाकडावरील कोरीवकामाची शैली ह्या शिल्पांत प्रत्ययास येते.

**सांची :**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतातील एक प्राचीन बौद्घ अवशेषांचे पर्यटनस्थळ. ते मध्य प्रदेश राज्यात विदिशा जिल्ह्यात भोपाळच्या ईशान्येस सु. ४७ किमी. व सांची रेल्वे स्थानकापासून १·४ किमी. वर आहे. येथील सर्व अवशेष विंध्याचलनामक टेकडीच्या पठारावर असून टेकडीची उंची ९१ मी.आहे.या टेकडीभोवती पूर्वी भरभक्कम दगडी तटबंदी होती मात्र ती आज जमीनदोस्त झाली असून तिचे जीर्णशीर्ण अवशेष गतवैभवाची साक्ष देतात.टेकडीच्या माथ्यावर बौद्घ स्तूप, विहार, चैत्यगृहे व मंदिरे यांचे अवशेष आढळतात. येथे उपलब्ध झालेल्या गुप्तकालीन कोरीव लेखांत या स्थळाचा उल्लेख ककनय, काकनाद, काकनादबोटी, बोटा-श्रीपर्वत असा केल्याचे आढळते. महावंस व दीपवंस या

बौद्घ ग्रंथांत त्यास चेतियगिरी म्हटले आहे. सांचीचा इतिहास सम्राट अशोक(इ. स. पू. २७३—२३२) याच्यापासून ज्ञात होतो तथापि येथील वास्तुकला व शिल्पकला तत्पूर्वीपासून बाराव्या शतकापर्यंतची आहे. सांचीला तीन बौद्घ स्तूप असून त्यांतील महास्तूपाची मूळ वास्तू अशोकाने बांधली. या स्तूपाचा शोध १८१८ मध्ये जनरल टेलर याने लावला. त्यात गौतम बुद्घाच्या अस्थींचे अवशेष असावेत, अशी एक वदंता आहे. त्या स्तूपाचा आकार विद्यमान स्तूपाच्या निम्मा असावा. हा मूळ स्तूप विटांचा होता आणि प्रशस्त जोते बांधून त्यावर लहानसे अर्धगोलार्ध घुमट बांधलेले होते. चौथऱ्यावरच प्रदक्षिणामार्ग होता. अशोकानंतर सु. शंभर वर्षांनी शुंग काळात (इ. स. पू. १८७— ७५) स्तूपाचा आकार वाढविण्यात आला आणि त्यावर शुंग राजांनी सुंदर कठडे व दगडी तोरणे बांधली.या पुनर्रचित स्तूपाचा व्यास सु. छत्तीस मी. व उंची साडेसोळा मी. होती. हा कठडा म्हणजेच वेदिका होय. हा बौद्घ शिल्पकलेतील एक वैशिष्ट्यपूर्ण घटक होय. महास्तूपानंतर उर्वरित दोन स्तूप नंतरच्या राजांनी बांधले. तसेच काही विहार, चैत्यगृहे आणि मंदिरे बांधली पण त्यांचा काल निश्चित नाही तथापि तेराव्या शतकापर्यंत हे बांधकाम चालू होते.

महास्तूपास इ. स. पू. पहिल्या शतकात चार दिशांस चार तोरणयुक्त प्रवेशद्वारे बांधण्यात आली. त्यांच्या उभारणीस पन्नास ते पाऊणशे वर्षांचा काळ लागला असावा. या तोरणांची उंची सु.१० मी. व रुंदी ६ मी. असून तोरणे हाच सांचीचा सर्वांत विलोभनीय कलाविष्कार आहे. येथील मूर्तिकाम उद्‌बोधक असून येथे भारहूत प्रमाणे वेदिकेवर कोरीव काम नाही मात्र भारहूत येथील सर्व रूपके दृग्गोचर होतात. या तोरणांत पूर्व व उत्तर दिशेची तोरणे तुलनात्मक दृष्ट्या कलापूर्ण व वैविध्यपूर्ण अलंकरणाने युक्त आहे. दक्षिणेकडील तोरण सर्वांत प्राचीन असून ते सातवाहन राजा सातकर्णी याच्या पदरी असणाऱ्या आनंदनामक कलाकाराने दान दिल्याचा कोरीव लेखात उल्लेख आहे. प्रत्येक तोरणाची सर्वसाधारण वास्तुरचना सारखी असून अन्य ठिकाणच्या तोरणांप्रमाणे ती अंतर्वक्र नसून चौकोनी आहेत. स्तंभ पायात चौकोनी असून उतळ्यांवरचे सिंह, बुटके यक्ष आणि हत्ती हे जणू आपल्या मस्तकावर तोरणाचा भार पेलत आहेत, असे वाटते. प्रत्येक तोरणाच्या माथ्यावर एकावर एक असे तीन आडवे शिल्पपट्ट एकमेकांपासून अलग खोदले आहेत. कठडे व तोरणे यांचे स्वरूप पाहता आणि ते तयार करण्याची पद्‌घती यांवरून हे दगडी काम मुळातील लाकडी नमुन्याबरहुकूम बनविलेले असावे. दोन फलकांमध्ये दगडी खुंट्या ठोकून त्यांचा विलगपणा दृढतर केला आहे. येथील मूर्तिकामात बुद्‌घाची मूर्ती कुठेच आढळत नाही मात्र बुद्‌घाचे अस्तित्व धर्मचक्र, रिकामे सिंहासन, बुद्‌घ पादुका इ. सांकेतिक प्रतीकांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न कलाकाराने केला आहे. याशिवाय बोधिवृक्षाखाली अशोक, त्याची राणी, राजपुत्र इ. मंडळी बुद्‌घाची पूजा करीत असतानाचे दृष्य आहे. त्याच ठिकाणी बुद्‌घाचे महाभिनिष्क्रमण, कश्यप ऋषींची कथा इ. शिल्पाकृती आढळतात. दक्षिण तोरणावर कमलवनातील लक्ष्मी, अशोकाची रामग्रामाची यात्रा, छदंत जातका तील कथाविषय इ. दृष्ये खोदली आहेत. पश्चिमेच्या तोरणावर हत्तींनी केलेली बोधिवृक्षाची पूजा, बुद्‌घाच्या अस्थींसाठी चाललेला अनुयायांतील झगडा, महाकपि, वेस्संतर आदी जातकांतील कथा यांचे चित्रण असून माराची बुद्‌घावर स्वारी, जेतवनदान इ. कथाविषयक दृष्ये कोरलेली आहेत. त्यांच्या डोक्यावर मध्यभागी एक चक्र व त्यावर त्रिशूल आहे. काही विद्वान हे त्रिशक्तीचे प्रतीक मानतात तर काही शिल्पज्ञ ते बुद्‌घ, धर्म व संघ या त्रिरत्नांचे प्रतीक मानतात. एकूण येथील शिल्पांकनात गौतमाच्या पूर्वजन्माच्या जातककथा त्याच्या चरित्रातील विविध प्रसंग, चार सिंह किंवा हत्तींचे त्रिरत्न चिन्ह यांसारख्या स्पष्टपणे धार्मिक आशय व्यक्त करणाऱ्या विषयांबरोबरच यक्ष-यक्षी, वृक्षिका अशी काही पारंपरिक रूपके आणि केवळ सुशोभनासाठी पशुपक्षी, लतापल्लव व भौमितिक रचनाबंध तोरणांवर कोरलेले आहेत. एकएक कथा व प्रसंग शिल्परूप करीत असताना त्या अनुरोधाने प्राकार, चैत्य, स्तूप, राजप्रासाद यांसारख्या वास्तू, त्यांतील आसने, मंचक, छत्रचामरे, मिरवणुकांच्या प्रसंगात सजविलेले हत्ती-घोडे आणि विविध पोषाखांतील विविध अलंकारांनी नटलेले स्त्री-पुरुष तपशिलांत कोरले आहेत. तसेच उभी, बसलेली, नृत्यात मग्न असलेली, मद्यपान केलेली, स्तूपापुढे नतमस्तक झालेली, प्रणयालापांत गुंग असलेली अशी अनेक युगुले दिसतात. येथील मूर्तिकामाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यात दैनंदिन जीवनातील हरतऱ्हेचे प्रसंग कोरले आहेत. त्यांवरून तत्कालीन जीवनाची सुस्पष्ट कल्पना येते. येथील कलाकारांना मोरांविषयी विशेष आस्था होती. जागोजाग त्यांचे शिल्पांकन आढळते. एकूण येथील अलंकरणात अनेक विषय असून त्यात वैविध्य आहे. येथील मानवाकृती प्रमाणबद्‌घ, एकसंध, जिवंत व लालित्यपूर्ण असून त्यात गतिमानता आहे. सर्व मूर्ती पूर्ण उठावातील असल्यामुळे

त्रिमिती छाया-प्रकाशाचा समतोल कलाकाराने साधला आहे.पूर्व दिशेच्या तोरणावरील सुप्रसिद्‌घ वृक्षी वा शालभंजिका या मूर्तीत हे कौशल्य प्रत्ययास येते. पारदर्शक तलम वस्त्रातील ही वृक्षिका प्रथम दर्शनी पूर्णतः नग्न वाटते व ती वृक्षाखाली जणू फांदीला लोंबकळत आहे, अशी खोदली आहे. तिची गतिमानता, पुष्ट वक्षःस्थळे आणि पृथुल नितंब तिच्या सौंदर्यात भर घालतात. तिच्या हातांत, कानांत आणि गळ्यात अलंकार आहेत. तोरणांवरील एकूण वृक्षिकांत गतिमानता आणि कमनीयता या दृष्टीने या वृक्षीचा क्रमांक उपलब्ध प्रतिमांत फार वरचा लागतो. बौद्‌घ कवी व लेखक अश्वघोषाने बुद्‌घचरितात तिची तुलना स्वर्गीय अप्सरेबरोबर केली आहे. या मूर्तीतून सुफलनाचा आविष्कार व्यक्त होतो, असे काही तज्ज्ञ मानतात.

येथील मंदिरे निरंधार (प्रदक्षिणामार्गविरहित) या सुरुवातीच्या विधान प्रकारातील असून गर्भगृह व मुखमंडप एवढी अंगे या वास्तुतून दृग्गोचर होतात. येथील विहार व चैत्यांचे स्वरूप परंपरागत असून बरीच पडझड झाली आहे तथापि येथील भग्न अवशेषांच्या संभारात एक अशोकस्तंभ असून त्यावरील ब्राह्मी लिपीत कोरलेल्या लेखात ‘लोकांनी आपापसांत भेदभाव वाढवू नये’ अशी आज्ञा आहे. याचे स्तंभशीर्ष (चार सिंहांचे) संग्रहालयात ठेवले आहे.

सांचीला अनेक उत्खनने झाली व अद्यापि प्रायोगिक तत्त्वावर उत्खनने होतात. कॅप्टन जॉन्सन याने १८२२ मध्ये केले तिसऱ्या स्तूपाचे उत्खनन आणि स्तूप वरून खाली खोदविला. त्यामुळे या वास्तूची नासधूस झाली. यात सर अलेक्झांडर कनिंगहॅमला १८५१ मध्ये एक धातुपात्र सापडले. त्यात चार बौद्‌घ आचार्यांच्या अस्थी होत्या. सुरुवातीच्या उत्खननांत क्रमांक दोनच्या स्तूपात बुद्‌घाचे दोन प्रमुख शिष्य सारिपुत्त व मोग्गलान यांच्या अस्थींचे करंडक कनिंगहॅमला सापडले. ते त्याने लंडनला पाठविले पण स्वातंत्र्यानंतर ते १९५३ मध्ये भारतात आणून त्यांसाठी नवीन विहार बांधला. अलीकडील १९९६-९७ च्या उत्खननात पहिल्या शतकापासून पाचव्या शतकांदरम्यानचे काही वास्तुविशेष आढळले. शिवाय एक आहत नाणे, शक-क्षत्रपांची १७६ चांदीची नाणी आणि मोगलपूर्व काळातील तीन तांब्याची नाणी सापडली.

सांचीतील कलावशेषांत हस्तिदंत कलेतील सूक्ष्मपणा व तपशिलांची रेलचेल आहे. विदिशा नगरीत एका काळी हस्तिदंती कला प्रगत अवस्थेत होती. शिवाय या ठिकाणी शुंग, गुप्त काळातील व नंतरचे अनेक कोरीव लेख-दानलेख सापडले असून त्यांतील एका लेखात हस्तिदंती कलाकारांच्या दानाचा उल्लेख आहे, त्यावरून या कलाकारांचा प्रभाव या कलेवर जाणवतो.

**वेरूळ :**

लेण्यांसाठी जगप्रसिद्ध असलेले भारतातील स्थळ. ते महाराष्ट्रात औरंगाबादच्या वायव्येस सु. २९ किमी. वर वसले आहे. या गावाजवळून इला नदी वाहते. सर्वसाधारणपणे येथील लेण्यांची निर्मिती इ.स. सहाव्या शतकापासून पुढे टप्प्याटप्प्याने होत गेली. वाकाटकांच्या ऱ्हासानंतर चालुक्य आणि कलचुरी या दोन राजवंशांच्या संघर्षकालातच ही लेणी कोरली गेली. तत्कालीन अस्थिर राजकीय परिस्थिती आणि या लेण्यांचे भौगोलिक स्थान यांतून वेरूळच्या लेण्यांतील व्यामिश्र कला आणि प्रादेशिक परंपरांचा उलगडा होतो. राष्ट्रकूट घराण्याच्या ताम्रपटात (आठवे शतक) या स्थळाचा उल्लेख `एलापुर’ असा केलेला असून त्यात येथील उत्कीर्ण लेण्यांचाही संदर्भ दिला आहे. अजिंठा येथील कलापरंपरा हरिषेण या वाकाटक सम्राटाच्या मृत्यूनंतर म्हणजे पाचव्या शतकाच्या अखेरीस खंडित झाली आणि तेथून बाहेर पडलेले शेकडो कलावंत नव्या राजवटीच्या आश्रयाखाली वेरूळच्या लेण्यांवर काम करू लागले, असे एक मत आहे. वेरूळ शिल्पाचा शैलीदृष्ट्या विचार करता हे मत थोड्याफार फरकाने ग्राह्य वाटते. सहाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, बहुधा कलचुरींच्या आश्रयाखाली हे काम सुरू झाले असावे. रामेश्वर लेण्याच्या समोर सापडलेली कलचुरी नाणी या कयासाला दुजोरा देतात.

महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर तेराव्या शतकात वेरूळ गुंफामध्ये वास्तव्य करून होते, असा स्थानपोथीमध्ये उल्लेख आहे. वेरूळ हे प्रदीर्घ काळापर्यंत तांत्रिक योगाचाराचे केंद्र होते, असेही दिसून येते. यानंतरची वेरूळची जी माहिती मिळते, तीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले हे वेरूळची

पाटीलकी चालवीत होते, असे कळते. अठराव्या शतकात अहिल्यादेवी होळकर (कार. १७५६–९५) यांनी इला (येलगंगा) नदीच्या काठी घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिंगाचे मंदिर बांधले. अहिल्यादेवींनी माणकेश्वर मंदिराचा (कैलास लेण्याचा) जीर्णोद्धार करून तिथल्या धूपदीपासाठी वर्षासन बांधून दिले, अशीही माहिती मिळते. मंदिरावर मध्ययुगीन रंगरंगोटीच्या खुणाही स्पष्ट दिसतात. अगदी अलीकडे या लेण्यांच्या परिसरात सातवाहनकालीन (इ. स. पू. दुसरे शतक ते इ. स. तिसरे शतक) वास्तूंचे अवशेष सापडल्याची नोंद झाली आहे.

सध्याच्या गावाच्या पश्चिमेला असलेल्या बालाघाटच्या टेकड्यांत, औरंगाबाद-वेरूळ या मार्गावरच दक्षिणेकडून उत्तरेकडे लेणी खोदण्यात आलेली असून त्यांची एकंदर संख्या चौतीस आहे. पुरातत्त्वखात्याने क्रमांक न दिलेली अनेक लहानमोठी लेणी या डोंगरात पसरलेली आहेत. मुख्य समूहातील दक्षिणेकडील भागात बारा लेणी असून ती बौद्ध धर्मीयांची आहेत. त्यानंतर सतरा लेणी हिंदू धर्मीयांची असून, त्यानंतर उत्तरेकडील पाच लेणी जैन धर्मीयांची आहेत. वेरूळच्या बौद्ध लेण्यांचा प्रारंभ सहाव्या शतकाच्या सुरुवातीस व्यापक प्रमाणात सुरू झाल्याचे दिसते. परंतु त्यातील अनेक प्रकल्प पुरेशा द्रव्यबळाअभावी इ. स. ६०० च्या आसपास बंद पडले असावेत. बौद्धांनी अर्धवट सोडलेल्या कित्येक गुंफा नंतर हिंदू लेण्यांमध्ये परिवर्तित केल्या गेल्या असाव्यात. हिंदू शिल्पप्रवृत्तीचा पहिला टप्पा प्रामुख्याने पाशुपत शैव संप्रदायाशी निगडित आहे. सहाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते चालुक्यांच्या कलचुरींवरील निर्णायक विजयापर्यंत-म्हणजे सातव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत-तो पूर्ण होतो. दुसरा टप्पा राष्ट्रकूटांच्या प्रवर्धमान शासनकाळात भक्तिसंप्रदायाच्या छटा दाखवणारा तर तिसरा टप्पा, ज्यात प्रामुख्याने जैन लेणी येतात, तो उत्तर राष्ट्रकूट काळात म्हणजे दहाव्या शतकाच्या शेवटीशेवटी पूर्ण झालेला दिसून येतो. यादवकाळातही काही तुरळक काम येथे झाले असावे. आठव्या शतकात येथील स्थापत्यकलेला बहर आला आणि सर्वोत्कृष्ट निर्मिती या काळात झाली.

वेरूळच्या लेण्यांमधील १ ते १२ क्रमांकांची लेणी बौद्ध, १३ ते २९ हिंदू आणि ३० ते ३४ जैन, अशी आहेत. क्रमांक १६ चे विख्यात कैलास लेणे आहे.

**बौद्ध लेणी** : यांत बहुतांशी विहारगृहे आहेत, फक्त एकच चैत्यगृह आहे. काही विहारगृहे शिल्पांनी आणि अलंकृत स्तंभांनी देखणी झालेली आहेत, तर काही अनेकमजली असल्याने भव्य वाटतात. ही सर्व प्रामुख्याने महायान पंथीयांची आहेत. काही गुंफांमधून वज्रयान प्रतिमांची सुरुवात झालेली दिसून येते.

**क्रमांक** 1 : हे लेणे शिल्परहित विहार आहे. भिक्षूंना निवासासाठी एकूण आठ खोल्या आहेत.

**क्रमांक** 2 : हे लेणे मंदिर आणि निवास अशा दोहोंसाठी उपयोगी पडत असावे. मात्र यात फक्त दोनच खोल्या निवासासाठी आहेत. मागील भिंतीत गर्भगृह व बाजूच्या बुद्धमूर्ती असलेल्या भिंती येथे आहेत. गर्भगृहात धर्मचक्रप्रवर्दनमुद्रेत सिंहासनावर बुद्धाची मूर्ती असून, डाव्या बाजूस अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाची मूर्ती आहे. उजव्या बाजूच्या दुसऱ्या बोधिसत्त्वाच्या मुकुटात स्तूपाची प्रतिमा आहे. गर्भगृहातील बुद्धमूर्तीच्या वर दोन्ही बाजूंना फुलांची माळ घेतलेल्या गंधर्वांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहाच्या बाहेर दोन्ही बाजूंना द्वारपाल असून त्यांतील (डाव्या बाजूचा) अक्षमाला आणि कमलपुष्प घेतलेला पद्मपाणी अवलोकितेश्वर आहे. उजव्या बाजूचा द्वाररक्षक उत्कृष्ट शिरोभूषणांनी अलंकृत केलेला वज्रपाणी अवलोकितेश्वर आहे. ही मूर्ती काहींच्या मते बोधिसत्त्व मंजुश्रीची असावी.

या लेण्याला प्रवेशमंडप असावा पण तो आता अस्तित्वात नाही. यात अत्यंत प्रेक्षणीय अशी जंभालाची (बौद्ध धर्मीयांचा कुबेर) मूर्ती आहे. त्याच्या बाजूस चवरी घेतलेले सेवक आहेत.

या प्रवेशमंडपातून आत गेल्यावर बारा खांबांचा चौकोनी मंडप आहे. त्या मंडपाच्या दोन्ही बाजूंस प्रचंड आकाराच्या पाच बुद्धमूर्ती आहेत.

**क्रमांक** 3 : शिल्पे, शिल्पपट आणि अलंकृत स्तंभ ही या पडझड झालेल्या लेण्याची वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या उत्तरेकडील भिंतीवर एक शिल्पपट आहे. अग्नी, मारेकारी आणि जलप्रवासातील आपत्ती यांच्यापासून अवलोकितेश्वर

संरक्षण करीत आहे, अशा आशयाचा हा शिल्पपट असून यातच उजव्या बाजूला सिंह, नाग, हत्ती व पिशाच्चे यांसारख्या आपत्तींपासूनही तो रक्षण करतो, हे या शिल्पातून दाखविले आहे. बुद्ध आणि बोधिसत्त्वाचे बदलते आणि भौतिकतेकडे झुकणारे स्वरूप या शिल्पपटातून सूचित होते. मध्यभागी असलेल्या मंडपात बारा खांब असून त्यांवर पूर्ण कलश आणि पत्रपल्लवी कोरलेल्या आहेत. मंडपाच्या बाजूच्या दोन्ही भिंतींत आठ, तर गर्भगृहाच्या दोन्ही बाजूंसही दोन खोल्या असून गर्भगृहात बुद्धमूर्ती आहे. द्वारपालांपैकी डाव्या बाजूची मूर्ती अवलोकितेश्वराची आहे.

या लेण्याच्या उत्तरेच्या भिंतीत प्रलंबपाद आसनातील, धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बुद्धमूर्ती व अवलोकितेश्वराचा शिल्पपट आहे. उजव्या भिंतीवर तारा व वज्रयान दैवतसमूहातील देवतेचे शिल्प आहे.

**क्रमांक ४ :** हे दुमजली लेणे असून दुसऱ्या मजल्यावर बुद्धाची प्रतिमा आणि दोन लहान खोल्या आहेत. बुद्धमूर्तीच्या डाव्या बाजूस कमलनालधारक अवलोकितेश्वर आहे. बोधिसत्त्वांच्या शेजारी स्त्री-सेविका आहेत. याशिवाय कमलपुष्प हातात धरलेली तारा आणि कमंडलू धरलेल्या भृकुटीचे शिल्प आहे.

**क्रमांक ५ :** हे लेणे सर्वांत प्रचंड (३५·६६ X १७·६७ मी.) आहे. या लेण्याला `महारवाडा' असे नाव प्रचलित असले, तरी `महाविहार' याचा हा अपभ्रंश असावा. गाभारा, दालन, मुख्य मंडप आणि दोन्ही बाजूंच्या पडव्या अशी याची विभागणी करता येते. दहा खांबांच्या दोन रांगांमुळे निरुंद पडव्या निर्माण झाल्या आहेत. दर्शनी भागात चार स्तंभ आहेत, तर पाठीमागे अंतराल असून भिंतीत मध्यभागी बुद्धप्रतिमा असलेले मंदिर आहे. अंतरालाला लागून दोन खोल्या, तर मंडपाच्या लगत एकूण सतरा खोल्या आहेत. सर्वसाधारणपणे या लेण्याची रचना चैत्यगृहाप्रमाणे आहे परंतु गाभाऱ्याची बाजू अर्धगोलाकृती नाही. लेण्याचे छतसुद्धा सपाट आहे. चैत्यगृहामध्ये आढळतो तसा स्तूप नाही प्रदक्षिणापथही नाही. गाभाऱ्यात प्रलंबपादासनात बसलेली बुद्धाची मूर्ती धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेत आहे. मंदिराबाहेर डाव्या बाजूची अवलोकितेश्वराची मूर्ती कमलनाल आणि अक्षमाला घेतलेली आणि खांद्यावर मृगाजिन ल्यालेली आहे तर दुसरी मुकुटधारी व अलंकार ल्यालेली आहे.

**क्रमांक ६ :** वास्तुविधानाच्या दृष्टीने या लेण्याचे तीन भाग पडतात. यांतील दर्शनी भागाचे स्तंभ शालभंजिकांच्या सुंदर शिल्पांनी अलंकृत केलेले होते, असे त्यांच्या अवशिष्ट स्वरपावरून दिसते. मधल्या भागात मंडप, त्यामागे अंतराल आणि त्यामागे बुद्धमंदिर आहे. दोन्ही बाजूंस दोन मोठे मंडप आणि बाजूंना नऊ खोल्या आहेत. मुख्य मंडपाचे छत कोसळल्यानंतर लाकडी छत बसविल्याच्या खुरा येथे दिसून येतात. स्तंभावर घटपल्लव (कलश आणि त्यातून डोकावणारी पाने) कोरलेले असून स्तंभाच्या वरच्या भागावर शार्दूल हस्त (ब्रॅकेट) आहेत. अंतरालात द्वारपाल वज्रपाणी व अवलोकितेश्वर यांच्या भव्य मूर्ती आहेत. त्यावर पुष्पहार घेतलेले विद्याधर आहेत. डावीकडील भिंतीवर तारादेवी आणि उजव्या भिंतीवर महामयूरी यांची सुंदर शिल्पे आहेत. मयूरवाहनाखालील बाजूस पोथी वाचत असलेला भिक्षू कोरलेला असून वर अंतराळात विद्याधर दाखविलेले आहेत. येथील गाभाऱ्याची द्वारशाखा अलंकरणामुळे उल्लेखनीय ठरते. यातील गंगा-यमुनेच्या लहान मूर्ती अत्यंत नेटक्या आहेत.

**क्रमांक ७ :** हे लेणे शिल्परहित असून अपूर्ण आहे.

**क्रमांक ८ :** या लेण्याचे वैशिष्ट्य म्हणजे, गाभाऱ्यातभोवती प्रदक्षिणापथाची सोय हे होय. स्वतंत्र गर्भगृह व बोधिसत्त्व (अवलोकितेश्वर, वज्रपाणी), जंभाल (पांचिक) व हारिती (एक देवता) यांच्या मूर्ती येथष आढळतात. गर्भगृहात प्रलंबपादासनातील बुद्धमूर्ती असून तिच्या दोन्ही बाजूंस वज्रपाणीची आणि मंजुश्रीची मूर्ती आहे. मंजुश्रीच्या शिरोभूषणात स्तूप कोरलेला आहे. या मूर्तीची स्त्री- सेविका तिच्या वैशिष्ट्यपूर्ण केशरचनेमुळे लक्षणीय वाटते. अंतराळाच्या उजव्या भिंतीवर महामयूरीची मूर्ती आहे. गर्भगृहासमोर मंडप आहे. यात तारा त्याचप्रमाणे जंभाल व हारिती यांच्या मूर्ती आहेत.

**क्रमांक ९ :** कोरीव दर्शनी भाग, प्रमाणबद्ध खांब, पद्मपाणी आणि तारा या देवतांचा प्रार्थनापट ही या लेण्याची वैशिष्ट्ये होत.

**क्रमांक १०** :हे लेणे `विश्वकर्मा' लेणे किंवा `सुतार' लेणे या नावाने विख्यात आहे. यात लाकडी बांधणीच्या चैत्यगृहाचा ठसा उमटलेला दिसतो व त्यामुळे या लेण्याला सुतार लेणे असे नाव पडले असावे. हे लेणे चैत्यगृह या प्रकारात समाविष्ट होत असले, तरी पूर्वीच्या चैत्यगृहांचा नालाकृती दर्शनी भाग व रचना आणि या चैत्यगृहाचा त्रिदलसदृश दर्शनी भाग व योजना यांत फरक दिसून येतो. आधीची चैत्यगवाक्षे (कार्ले, भाजे येथील) इथे अभावानेच आढळतात. `हे चैत्यगृह भारतीय शैलगृहामधील अखेरची कलाकृती' असल्याने चैत्यगृहांच्या मांडणीत किती आणि कसा फरक होत गेला, याचे प्रत्यंतर हे लेणे पाहताना येते. येथे काष्ठकामाची परंपरा खडकाच्या कोरीव कामातही जोपासली गेली. त्यामुळेच या लेण्याच्या दक्षिणेकडील व्हरांड्यात तुळ्या आणि लगी खडकातच कोरलेल्या आहेत.

या लेण्याचे सौंदर्य दरवाज्यातून डोकावल्याखेरीज उलगडत नाही. आत प्रशस्त प्रांगण असून त्याच्या दोन्ही अंगांना खांबांचे सोपे आहेत आणि समोरही ओसरी आहे. प्रांगणाच्या तिन्ही बाजूंचे स्तंभ घटपल्लवयुक्त असून ते वरचा मजला तोलन धरतात. प्रवेशमंडपाच्या मागच्या भिंतीत असलेल्या दरवाजातून चैत्यगृहात जाता येते. हे चैत्यगृह गजपृष्ठाकृती आकाराचे असून त्यामध्ये एक मोठा स्तूप कोरलेला आहे. या स्तूपाच्या दर्शनी भागावर बोधिवृक्षाखाली प्रलंबपादासनातील धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेतील बुद्धमूर्ती (४·८७ मी. उंच) आहे. बुद्धमूर्तीच्या दोन्ही बाजूंस बोधिसत्त्वाच्या मूर्ती व त्यावर आकाशात विहार करणारी गंधर्व -मिथुने बुद्धावर पुष्पवर्षाव करीत आहेत, असे दर्शविले आहे. छताजवळील पाटिकेवर बुद्ध, बोधिसत्त्वांच्या मूर्ती असून त्यांच्या खाली बुटक्या व स्थूल गणांची रांग कोरलेली आहे. त्यावर नागदेव व नागदेवी यांची शिल्पे आहेत. यांच्या मागून बहिर्गोल फासळ्या निघताना दाखविलेल्या आहेत.

विश्वकर्मा लेण्याचा दर्शनी भाग इतर लेण्यांहून वेगळा व कलात्मक आहे. वरच्या मजल्याच्या आत जी भिंत आहे, तीत मध्यभागी एक द्वार असून त्यातून चैत्यमंदिरात प्रवेश करता येतो. या द्वाराभोवती साधारणतः त्रिकोणी कपाटात मुख्य तोरण आणि गवाक्ष, त्रिकोणाच्या दोन्ही बाजूंस कुंभ, अर्धस्तंभ आणि वळणदार पालवी यांचे मिळून झालेले गोष्ठपांजर, तर दरवाज्याच्या माध्यावर स्तंभशीर्ष किंवा प्रस्तर आणि यावर जवळजवळ वर्तुळाकृती गवाक्ष आणि गवाक्ष, प्रस्तर आणि द्वार या सर्वांना सामावून घेणारी त्रिदली महिरप आहे. दोन दले जोडून त्रिदलासारखी एक नावीन्यपूर्ण आकृती लक्ष वेधून घेते. हिच्या दोन्ही बाजूंना शिखरांच्या प्रतिकृती कोरलेल्या आहेत. गवाक्षाच्या दोन्ही बाजूंस अंतरिक्षात गंधर्व-दांपत्ये कोरलेली आहेत. द्वाराच्या एका बाजूला अवलोकितेश्वर व दुसऱ्या बाजूला वज्रपाणी आहेत. प्रत्येक कोनाड्यात प्रणयी युग्मे कोरलेली आहेत. मिथुने आणि गण यांची रेलचेल आहे. चैत्यमंदिराचे स्तंभ साधे असले, तरी त्यांच्यावरील तुला आणि स्तंभशीर्षे यांवर यक्षशिल्पे आहेत.

गवाक्षाच्या दर्शनी भागावरील डाव्या कोनाड्यात असलेल्या शिल्पात एक शिलालेख आहे. मात्र तो महायान पंथीयांनी प्रसारित केलेला मंत्र असून तो नंतर कोरलेला असावा, असे त्यांच्या अक्षरवटिकेवरून स्पष्ट होते.

**क्रमांक ११** : हे लेणे `दोन ताल' या नावानेही प्रसिद्ध आहे. या शेजारचे लेणे तिमजली असल्याने त्याला `तीन ताल' असे संबोधले जाते. ही दोन्ही लेणी येथील बौद्ध लेण्यांची अखेर दाखवतात. दो ताल लेण्यातील सर्वांत खालचा मजला १८७६ पर्यंत मातीने भरून गेल्याने त्याचे अस्तित्व कळत नसे. भिक्षुगृहे आणि बुद्धप्रतिमायुक्त गर्भगृह यांमुळे या लेण्याचे स्वरूप मंदिर आणि विहार असे दुहेरी राहिलेले आहे.

लेण्याच्या दर्शनी भागात आठ खांब कोरलेले असून त्यांच्या मागे अरुंद ओवरी आहे. या ओवरीच्या पाठीमागील भिंतीत पाच लेणी कोरलेली आहेत. पहिले लेणे अपूर्ण, तर दुसऱ्या बुद्धप्रतिमा आहे. ही मूर्ती भव्य असून ध्यानासनात आणि भूमिस्पर्शमुद्रेत आहे. मूर्तीचे आसन गण सावरून धरीत असून जवळच बुद्धाला पायस देणाऱ्या सुजातेचे शिल्प आहे. नेहमीप्रमाणे दोन्ही बाजूंस अवलोकितेश्वर आणि वज्रपाणी हे बोधिसत्त्व आहेत. गाभाऱ्याच्या बाजूच्या भिंतीत अनेक बोधिसत्त्वांच्या मूर्ती कोरलेल्या असून, त्यांत मैत्रेय (हातात फूल आणि मुकुटात स्तूप), स्थिरचक्र (हातात तलवार), मंजुश्री (कमळ आणि पुस्तक) व ज्ञानकेतू (ध्वज) या स्पष्टपणे ओळखता येतात. याशिवाय जंभाल (कुबेर) आणि तारा (हातात कमळ) यांचीही शिल्पे येथे आहेत. जंभालमूर्तीच्या डाव्या हातात धनाची

थैली आहे आणि खाली एक व्यक्ती नाण्यांनी भरलेला कलश घेऊन उभी आहे. या मजल्याच्या मध्यभागी असलेल्या सभामंडपाच्या मागील भागाऱ्यात भूमिस्पर्शमुद्रेतील ध्यानस्थ बुद्धमूर्ती आहे.

या लेण्याचे वैशिष्ट्य असे की, मंडपाच्या उजव्या आणि समोरच्या भिंतींवर हिंदू देवदेवतांच्या — महिषासुरमर्दिनी, गणेश, काल-प्रतिमा कोरल्या आहेत. बौद्ध धर्माचा प्रभाव नष्ट झाल्याच्या काळातील त्या असाव्यात हे स्पष्ट होते.

**क्रमांक १२ :** दो ताल लेण्याच्या शेजारी `तीन ताल' या नावाने ओळखले जाणारे हे तीन मजली लेणे आहे. साधे स्तंभ पण लेण्यात शिल्पाकृतींची रेलचेल हे या लेण्याचे वैशिष्ट्य. याची भव्यताही स्तिमित करते. महायान पंथीय बौद्धांची ही शेवटची निर्मिती समजली जाते.

लेण्याच्या समोर एक प्रशस्त अंगण आहे. तिन्ही मजल्यांत आठ-आठ उत्कीर्ण स्तंभांच्या रांगा असून बहुतांशी सर्व खांब चौकोनी ताशीव आहेत. साध्या घटकांतून भव्यतेची छाप पाडली जाते. तळमजला रुंद आहे. त्यातील दोन दर्शनी स्तंभ पूर्णघट-चिन्हयुक्त असून उर्वरित सर्व साधे व चौकोनी आहेत. या मजल्यावर भिक्षूंसाठी नऊ खोल्या आहेत. येथील अंतराल लक्षणीय आहे. त्याच्या उजव्या बाजूच्या मागच्या भिंतीत नऊ मूर्तींचा शिल्पपट आहे. त्याच्या उजव्या बाजूच्या मागच्या भिंतीत नऊ मूर्तींचा शिल्पपट आहे. मध्यभागी बुद्धप्रतिमा, उजव्या बाजूस पद्मपाणी अवलोकितेश्वर, डाव्या बाजूस वज्रपाणी, त्यांच्या वर तीन मूर्ती. डावीकडील मागच्या भिंतीवर अवलोकितेश्वर आणि मंजुश्रीसमवेत बुद्ध कोरलेला आहे. अंतराळाच्या मागे गर्भगृहात ध्यानस्थ बुद्धाची भव्य प्रतिमा असून भिंतीवर मैत्रेय, मंजुश्री, स्थिरचक्र आणि ज्ञानकेतू या चार बोधिसत्त्वांची शिल्पे आहेत. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस बुद्ध, ध्यानस्थ तारा, तर उजव्या बाजूस चुंडा या स्त्रीबोधिसत्त्व मूर्ती आहेत. वरच्या मजल्याच्या वाटेत भूमिस्पर्शमुद्रेत बुद्ध आहे. याशिवाय उजव्या भिंतीवर जंभाल (कुबेर), अवलोकितेश्वर आणि तारा यांच्या मूर्ती असून, डाव्या भिंतीवर नऊ मूर्तींचा मंडलपट आहे. सर्वांत वरच्या मजल्याचे वैशिष्ट्य म्हणजे शिल्पांची रेलचेल आणि स्थापत्यातील योजनाबद्ध रेखीवपणा. भिंतीवर बुद्धप्रतिमा कोरलेल्या असून काही ध्यानमुद्रेत, तर काही धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेत दाखविल्या आहेत. मुख्य मंदिराच्या दोन्ही बाजूंस, प्रत्येकी सात यांप्रमाणे चौदा बुद्धमूर्तींची रांग कोरलेली आहे. या सात बुद्धमूर्ती ध्यानमुद्रेत असून, त्यांच्या मस्तकांच्या वर निरनिराळ्या वृक्षशाखा कोरलेल्या आहेत. मुख्य मंदिराच्या दाराच्या दोन्ही बाजूंस द्वारपाल आहेत. मंदिरात 3.35 मी. उंचीची भूमिस्पर्शमुद्रेतील बुद्धाची मूर्ती असून बुद्धाच्या मूर्तीभोवती प्रदक्षिणापथ आहे. मूर्तीवर चुन्याच्या गिलाव्याचे अवशेष आढळतात, त्यावरून ही मूर्ती रंगविली जात असावी. छतावरही रंगकामाचे अवशेष आहेत. या रंगकामाचा काळ नववे शतक असा मानला जातो.

परंपरागत गवाक्षापासून वेगळेपण, आखणीतील भव्य परिमाणे, अनेक मजल्यांची खशेदकामे आणि शिल्पांची रेलचेल ही वेरुळच्या बौद्ध लेण्यांची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

**हिंदू धर्मीय लेणी :** लेणी क्रमांक १३ ते २९ ही हिंदू धर्मीयांची आहेत. ही सर्वसाधारणपणे सहाव्या ते आठव्या शतकांतील निर्मिती आहे. यात शैव शिल्पांची आणि शिवाच्या जीवनातील प्रसंगांच्या शिल्पपटांची संख्या अधिक असून वैष्णव शिल्पे तुलनात्मक दृष्ट्या कमी आहेत. राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याच्या अमदानीच्या आधीची आणि तिच्या समकालीन व नंतरची असे दोन विभाग कालदृष्ट्या आणि कलादृष्टीने करता येतात. यानुसार लेणी क्र. १४, १७, १८, १९, २०, २१, २२, २५, २७, २८ व २९ ही लेणी राष्ट्रकूटांच्या प्रभावाच्या आधीची असून, ही सहाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील असावीत. शैली व आखणी या दृष्टींनी लेणे क्रमांक २९ (सीता की नहाणी) घारापुरीच्या लेण्यांशी आश्चर्यकारक साम्य दर्शविते. लकुलीश-शिवाच्या प्रतिमांची शिल्पे (लेणी क्र. १८, २१, २९) ही वेरूळवरील लकुलीश-पाशुपत पंथाचा प्रभाव स्पष्ट करतात. आठव्या, दहाव्या व बाराव्या शतकांतील भित्तिचित्रांचे अवशेष हे कैलास लेणे, जैन गुंफा आणि डोंगरमाथ्यावरील गणेश लेण्यांत आढळतात.क्रमांक १४: हे लेणे `रावण की खाई' या नावाने ओळखले जाते. त्यातील कैलास पर्वत हलविणाऱ्या रावणाच्या शिल्पपटामुळे त्याला हे नाव पडले असावे. क्रमांक २ च्या बौद्ध

लेण्याचा आराखडा जवळजवळ असाच आहे. याच्या बाजूच्या भिंतीत अर्धस्तंभामुळे शिल्पपटांना जणू चौकट लाभली आहे. दर्शनी खांबाचे अर्धे भाग साधे चौकोनी असून वरच्या भागात पूर्णघटाचे अलंकरण आहे.

उत्तरेकडील भिंतीत बहुतांशी वैष्णव शिल्पपट आहेत. पहिल्या खणात त्रिशूल घेतलेली दुर्गा आहे तर त्यानंतरच्या खणात कमलासना गजलक्ष्मी असून तिच्या मस्तकावर चार हत्ती पाणी शिंपडीत आहेत. तिसऱ्यात भूवराहाचा पट आहे. वराहाची भव्यता व आवेश आणि पृथ्वीदेवीची प्रमाणबद्ध मूर्ती यांमुळे हा शिल्पपट देखणा झालेला आहे. त्यानंतरच्या खणात भूदेवी व श्रीदेवी यांसह श्रीविष्णू वैकुंठात बसल्याचे शिल्प आहे. त्यानंतर मकरतोरणाखाली विष्णु-लक्ष्मीची मूर्ती आहे.

मुख्य मंदिराच्या दरवाज्याजवळ स्त्री-द्वारपाल असून त्यांच्या बाजूसच मकरावर उभी गंगा, कूर्मावर उभी यमुना आणि भव्य द्वारपाल यांची शिल्पे आहेत. येथे प्रदक्षिणापथ असून त्याच्या भिंतीत शिल्पपट, शिल्पे आणि शिल्पसमूह आहेत. यांत उत्तरेकडील भिंतीत सालंकृत व बालकांसहित सप्तमातृका असून त्या वीरभद्र आणि गणेश या दोहोंच्या मधे खदलेल्या आहेत.

दक्षिणेकडील भिंतीतही शिल्पपट आहेत. प्रथम अंधकासुरवध कथेतील शिव दाखविला आहे. या शिल्पातील क्रोध-आवेश या भावांचे चित्रण अप्रतिम आहे. दुसऱ्या शिल्पपटात शिव-पार्वती विहार करीत असलेल्या डोंगरावरून रावणाचे पुष्पक विमान पुढे जाण्यास प्रतिबंध निर्माण झाला, त्या प्रसंगाचे शिल्पांकन आहे. रावणाचा आवेश आणि जिद्द, शंकराची शांत मुद्रा आणि पार्वतीची भयग्रस्तता व पतीचा आधार घेण्यासाठी त्याला बिलगण्याची कृती या सर्व मुद्रा शिल्पकाराने अत्यंत वास्तव स्वरूपात दाखविल्या आहेत. याशिवाय तंडवनृत्यातील शिवाचे नृत्य पाहण्यास गणे, पार्वती, ब्रह्मा, विष्णू, इंद्र आणि अग्नी उपस्थित आहेत, असा शिल्पपट पुढे आहे. दुसऱ्या एका शिल्पात शिव-पार्वती पट खेळत असल्याचे दाखविले आहे. शिवाचे खेळण्यात लक्ष नसल्याने पार्वती रुसलेली आहे व तिने रुसून मुखकमल फिरविले आहे. शिव तिचा हात धरून आणखी एक खेळ खेळण्यासाठी अनुनय करीत आहे. पार्वतीच्या मुखावरील रुसवा आणि शंकराची अनुनयातली अजिजी शिल्पकाराने छान टिपली आहे. या शेजारच्या खणात भव्य नटराज आणि शेवटच्या खणात महिषादुरमर्दिनीचे शिल्प आहे.

**क्रमांक १५** : हे लेणे `दशावतार' लेणे म्हणून प्रख्यात आहे. गतिमान शिल्पे, राष्ट्रकूट दंतिदुर्गाचा उत्कीर्ण लेख आणि पुराणातील कथा दाखविणारे शिल्पपट ही या लेण्याची वैशिष्ट्ये होत. हे लेणे दुमजली आहे. त्याच्या दर्शनी खांबाच्या माथ्यावर भूमिस्पर्शमुद्रेतील बुद्धाची मूर्ती कोरलेली आहे.

या लेण्यासमोर प्रशस्त प्रांगण आहे आणि त्याच्या मध्यभागी एक मंडप आहे. मुख्य मंडपाच्या मागील भिंतीवर राष्ट्रकूल घराण्यातील दंतिदुर्ग राजाचा प्रदीर्घ लेख आहे. राष्ट्रकूट घराण्याची वंशावळ आणि शेवटी दंतिदुर्ग या लेण्यात सैन्यासह येऊन गेल्याचा उल्लेख यात आहे. मंडपावर सिंह, यक्ष, गर्भगृहांच्या प्रतिकृती, गंगा, यमुना इ. मूर्ती आणि जाळीदार खिडक्या आहेत.

हे लेणे दुमजली आहे. याच्या उत्तरेकडील कोपऱ्यात जिन्याच्या पायऱ्या असून, मधल्या कट्ट्याच्या भिंतीत कोनाडे आहेत. त्यांत गणेश, शिव – पार्वतीची आलिंगन-मूर्ती, सूर्य, शिव- पार्वती, गजानन-गण, महिषादुरमर्दिनी, अर्धनारीनटेश्वर, दुर्गा, तपस्वी उमा, गणेश, काली इ. मूर्ती आहेत. अंतराळाच्या आत गाभारा आहे. त्याच्या दर्शनी खांबावर आमलक, पूर्णघट, प्रणालिका, यक्ष इ. घटक आहेत.या लेण्यात शिल्पपटांची रेलचेल आहे. उत्तरेकडे शैव आणि दक्षिण भिंतीवर वैष्णव शिल्पे आहेत. उत्तरेकडील पहिल्या खणात अंधकासुरवधमूर्ती असून ती रौद्रभीषण आहे. शिव अष्टभुज असून हातांत तलवार, डमरू, नीलासुराचे कातडे इ. आयुधे आहेत. शेजारी स्तिमित झालेली पार्वती व नरकपाल धरलेली काली असून, शिवाच्या पायाखाली अपस्मार पुरुष आहे. शिवाच्या गळ्यात रुंडमाला असून त्याने अंधकासुराला त्रिशूलाने विद्ध केलेले आहे. योगेश्वरीच्या जवळ घुबड, तर अंधकासुराच्या पायाजवळ राहूचे मस्तक दाखविलेले आहे. दुसऱ्या खणात तांडवनृत्यातील शिवप्रतिमा आहे. तिसऱ्या खणात शिवलिंग असून छतावर

वेलबुट्टीच्या अलंकरणाचे अस्पष्ट अवशेष दिसून येतात. चौथ्या खणात शिव-पार्वती पट खेळतानाचे दृश्य आढळते. दुसऱ्या एका खणात `कल्याणसुंदर' मूर्ती असून शिवाचा पार्वतीशी झालेला विवाह शिल्पित केलेला आहे. यापुढील शिल्प `रावणानुग्रह' (रावण कैलास पर्वत हलविण्याचा प्रयत्न करीत आहे व या प्रयत्नात फसल्यावर शिवाने त्याच्यावर अनुग्रह केल्याची कथा) आहे.

पाठीमागील भिंतीवर मार्कंडेयानुग्रह आणि गंगावतरण ही शिल्पे आहेत. मार्केंडेय अल्पायुषी असतानाही त्याने शिवाराधना केली. ठरल्या वेळी यमाने आपले पाश मार्कंडेयाभोवती टाकल्यावर शिवाने आपल्या भक्ताचे रक्षण करण्यासाठी यमाला लाथ मारली, तेव्हा तो परत गेला आणि मार्कंडेय चिरंजीव झाला. यमाचे दुसरे नाव `काल' आहे. त्याचा नाश केल्याचे चित्रण केलेल्या या शिल्पास `कालारि' असे नाव दिले गेले आहे. क्रोधयुक्त शिव आवेशाने त्रिशुलाचा आघात यमावर करीत आहे. दुसऱ्या खणात गंगावतरणाचा प्रसंग आहे. शिवाने गंगा आपल्या जटापाशात बद्ध केल्याने या चित्रणास `गंगाधर शिव' असे नाव आहे. तप करणारा सागरही यात कोरलेला आहे मात्र हा शिल्पपट बराचसा विच्छिन्न झालेला आहे.

अंतराळाच्या डाव्या भिंतीवर गणेश, तर उजव्या बाजूस कार्तिकेय आहेत. गाभाऱ्याच्या उजव्या बाजूस गजलक्ष्मी, तर डाव्या बाजूस सरस्वती आहे. याशिवाय द्वारपालही आहेत. गाभाऱ्यात भग्नावस्थेतील शिवलिंग आहे. अंतराळाच्या खांबावर मिथुने कोरलेली आहेत. मागच्या भिंतीवर लिंगोद्‌भव शिव आणि त्रिपुरांतक शिव यांच्या मूर्ती आहेत. यातील लिंगोद्‌भव शिवमूर्तीच्या शिल्पात मधोमध ज्योतिर्मय शिवलिंग दिसत असून, उजव्या बाजूस वराहरूपी विष्णू व डाव्या बाजूस ब्रह्मा त्या लिंगाचा आदि-अंत शोधू पाहत आहेत. लिंगातून शिवमहादेव प्रकट झालेला आहे. त्रिपुरांतक शिव-शिल्पात रथारूढ शिव, रथाला सूर्य-चंद्राची चाके, ब्रह्मा सारखी, शिवधनुष्य म्हणून मेरू पर्वत, धनुष्याची दोरी म्हणून वासुकी नाग, विष्णुरूपी बाण आणि रथ नेणारे चार वेद अश्वरूपाने दाखविले आहेत.

उजव्या बाजूच्या भिंतीत अनुक्रमे गोवर्धनधारी कृष्ण, शेषशायी विष्णू, गजेंद्रमोक्ष करणारा विष्णू, भूवराह, त्रिविक्रम विष्णू आणि हिरण्यकशिपूचा वध करणारा नरसिंह ही शिल्पे आहेत. ही वैष्णव शिल्पे अत्यंत प्रमाणबद्ध, गतिमान आणि विविध भावमुद्रांचे यथार्थ दर्शन घडविणारी आहेत.

गर्भगृहासमोर सुटा नंदी आहे. प्रांगणाच्या उत्तरेतील भिंतीत एक लेणे असून त्याच्या गर्भगृहात शिवलिंग आणि त्याच्यामागे त्रिमूर्तीचे (अघोर, तत्पुरुष, कामदेव) शिल्प आहे.

या लेण्यातील शिल्पपटांची शैली आणि दर्जा दोन्ही अनियमित आहेत. जणू विविध कलापरंपरांमधून आलेले वेगवेगळ्या वकूबांचे शिल्पकार तेथे काम करून गेले असावेत. त्यावरून कैलास लेण्यासारख्या महत्त्वाकांक्षी योजनेला हात घालण्याआधी भारताच्या विविध भागांतून आलेल्या शिल्पीसंघांचे कसब इथे अजमावून त्यातून त्यांची निवड झाली असावी, असा अंदाज बांधता येईल. येथे काम करणाऱ्या आंध्र प्रदेशातील एका शिल्पीसंघाने नंतर पुण्याचे पाताळेश्वर लेणे कोरले असावे, असे समजण्यास वाव आहे.

**क्रमांक १६ :** हे कैलास लेणे म्हणून ओळखले जाते. `माणकेश्वर' असाही त्याचा उल्लेख सापडतो. सर्वच दृष्टींनी हे लेणे भव्य असून, ते वेरूळचा मुकुटमणी मानले जाते. `आधी कळस मग पाया' हे वचन ह्या वास्तुरूपात पाहावयास मिळते. या लेण्याच्या निर्मितीस राष्ट्रकूटांचा राजा दंतिदुर्ग याच्या कारकीर्दीत प्रारंभ होऊन, पहिल्या कृष्णराजाने (कार. सु. ७५६-७७३) त्यास पूर्ण रूप दिले. पुढील राजांच्या काळात या शिवमंदिराच्या ओव्या, सरितामंदिर, लंकेश्वर लेणे, मातृकामंदिर इ. खोदण्यात आली.

कैलास लेणे हे सौंदर्यशाली शैलमंदिर आहे. या लेण्याच्या कलात्मक आविष्कारात पल्लव-चालुक्यकालीन शैलींची संमिश्र छटा जशी दिसून येते, तसेच विमान, गोपुर इ. घटकांत द्राविड शैली स्पष्ट होते.

वेरूळ येथील सर्वांत मोठे आणि सौंदर्यशाली शैलमंदिर. याचे मूळ नाव कैलासनाथ. राष्ट्रकूटांचा राजा दंतिदुर्ग याच्या कारकीर्दीत अगदी लहान प्रमाणावर आरंभण्यात आलेल्या ह्या शिवमंदिरास प्रथम कृष्णराज याने पूर्ण रूप दिले

(आठवे शतक). त्यानंतरही तीन-चार राजांच्या काळात मंदिराभोवती ओवऱ्या, सरितामंदिर, लंकेश्वर लेणे तसेच मातृकामंदिर ही खोदण्यात आली. राष्ट्रकूटांच्या चार पिढ्यांची धर्मभावना आणि दातृत्व ह्यांच्या योगाने आजचे शैलमंदिर साकार झाले. शैलमंदिर या शिल्पप्रकाराची कैलासनाथ लेणे ही सर्वांत परिणत अवस्था होय. तोपर्यंत वास्तूचा समोरचा आणि आतील भाग यांची हुबेहूब प्रतिकृती शैलमंदिरात करण्यात येत असे. परंतु महाबलीपूर येथील रथांप्रमाणे मंदिराच्या सर्व अंगोपांगांची पूर्ण प्रतिकृती येथे करण्यात आली आहे. आकारमान व कलात्मक रचना या दृष्टींनी महाबलीपूरपेक्षा हे लेणे अधिक प्रभावी वाटते. पट्टदकल येथील विरूपाक्ष मंदिर आणि कांचीपुरम् येथील कैलासनाथ मंदिर या दोन वास्तूंचा आदर्श वेरुळच्या लेण्यात दिसून येतो. तद्वतच शिल्पशैलीही पल्लव व चालुक्य संप्रदायांची स्पष्ट छाप दाखविते.

एका टेकडीच्या उतरत्या कडेला, गोपुरासाठी आणि मुख्य मंदिरासाठी आवश्यक तेवढी जागा शिल्लक ठेवून ३० मी. रुंद आणि तितकाच खोल चर प्रथम खणून काढण्यात आला. मध्यभागी उरलेल्या ६० मी. लांब व ३० मी. रुंद पहाडातून कैलासनाथ मंदिराची इमारत व त्यापासून समोर ३० मी. अंतरावर ठेवण्यात आलेल्या ठोकळ्यातून प्रवेशद्वार व गोपुर खोदण्यात आले. मंदिराचे विधान अथवा रचनाकल्प साधा आहे : चौकोनी गाभारा, त्याच्याभोवती थोड्या अंतरावर पाच छोटी देवळे, समोर चौरस मंडप व मंडपासमोर थोड्या अंतरावर नंदिमंडप. मंडप व नंदिमंडप यांना जोडण्यासाठी पहाडाचाच पूल खोदला आहे. मंदिराच्या वास्तूचा सबंध तळमजला भरीव आहे. कमरेइतक्या जोत्यावर पहाडातच हत्ती, सिंह, व्याल यांच्या प्रचंड मूर्ती खोदलेल्या आहेत. त्यांच्या डोक्यावर मंदिराची इमारत असून त्यांतील स्तंभ, कोनाडे, छपरे, विमान व शिखर द्राविड शैलीची आहेत. वास्तू म्हणून स्वभावतः देखण्या असलेल्या या मंदिराला उत्कृष्ट मूर्तिकामाचा साज चढविण्यात आलेला आहे. गोपुराच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर त्रिपुरान्तक, गरुडवाहन विष्णू, अर्जुन-सुभद्रा विवाह अशांसारख्या पौराणिक देखाव्यांचे चित्रण आहे. आत दोन्ही बाजूंना डौलदार गजमूर्ती असून ध्वजस्तंभही आहेत. मंदिराच्या जोत्यावर रामायण आणि महाभारत यांतील कथादृश्ये शिल्पांकित केली आहेत. परंतु त्यांत कथात्मक कलादृष्टी आढळत नाही. इतर शिल्पे आकाराने खूपच मोठी असून त्यांत रावण व जटायू यांचा संग्राम, त्रिपुरवध असे प्रसंग दिसतात. या सर्वांत कैलासोद्धरणाचा देखावा अत्यंत नाट्यमय आहे. शिवपार्वतीचे अधिष्ठानच असा कैलास पर्वत आपल्या बाहूने गदगदा हलवू पाहणारा दशानन, भयभीत झालेली पार्वती आणि तितकाच धीरगंभीर व शांत असणारा शिव अशी प्रतिमाशिल्पे त्यांत असून शिल्पित व्यक्तींच्या हालचाली व मुद्रा अत्यंत परिणामकारक आहेत. मंदिराच्या आतील भागावर विलेपन करून रंगकाम केले होते. त्यांतील आज शिल्लक असणाऱ्या कामावरून ते अजिंठ्यापेक्षा फारच निकस वाटते. कल्पनाशक्तीची झेप म्हणून हे मंदिर संस्मरणीय असले, तरी पहाडाच्या पोटातच हे खोदीव, रेखीव मंदिर ठेवण्यामागील कलादृष्टी विशेष श्रेष्ठ समजता येत नाही.

**क्रमांक १७ :** हे लेणे आखणी, स्तंभ आणि शिल्पपट या दृष्टींनी प्रेक्षणीय आहे. यातील गण, शालभंजिका व त्यांच्या बाजूस असलेल्या सेविका व गंधर्व यांच्या कमनीय मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**क्रमांक १८ ते २० :** ही लेणी सर्वसामान्य असून, त्यांत उल्लेखनीय अशी वैशिष्ट्ये नाहीत.

**क्रमांक २१ :** हे लेणे `रामेश्वर' लेणे म्हणून ओळखले जाते. याचे दर्शनी भागाचे खांब कमनीय शालभंजिकांमुळे प्रेक्षणीय झाले आहेत. बाजूच्या खांबांना जोडून असलेल्या कठड्यावर गजथर असून त्यावर एकूण चौदा मिथुने कोरलेली आहेत. कठड्यास लागून असलेल्या भिंतीवर गंगा आणि दुसऱ्या बाजूस यमुना आहे. गंगेची त्रिभंगातील मूर्ती शरीरसौष्ठव व कलात्मक केशरचना यांमुळे लक्ष वेधून घेते. सभामंडपाच्या दोन्ही बाजूंस उंच जोत्यावर दोन लहान उपवर्णक असून, त्यांत डाव्या बाजूला शिव-पार्वतीचा विवाहसोहळा दाखविलेला आहे. पंचाग्निसाधन करणारी उमा, हिमालयाकडे उमामहेश्वरांचा विवाहप्रस्ताव घेऊन गेलेला ब्रह्मा आणि शिव-पार्वती विवाह (कल्याणसुंदर) हे तिन्ही पट अप्रतिम आहेत. विशेषतः विवाहप्रसंगी पार्वतीच्या चेहऱ्यावर दर्शविलेला सलज्ज भाव अत्यंत विलोभनीय आहे. याशिवाय महिषासुरमर्दिनी आणि मोरावर बसलेला कार्तिकेय यांची शिल्पे आहेत. त्याचा अग्नीशी असलेला संबंध

अजमुख सेवक सूचित करतात. अंतराळाजवळ रावणानुग्रहाचा शिवमूर्तीपट आहे. दक्षिण दालनात सप्तमातृका, नटराज आणि कंकाल-काली यांची शिल्पे आहेत. सप्तमातृका दालनाजवळ शिव-पार्वती पट खेळत असल्याचे शिल्प आहे.

**क्रमांक २२ :** हे लेणे `नीलकंठ' या नावाने ओळखले जाते. तेथील नंदी-मंडपाच्या उजव्या बाजूच्या मंडपात सप्तमातृकांची शिल्पे आहेत. शिवाय गणेश, कार्तिकेय, गजलक्ष्मी आणि कमलासना देवी यांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहात शिवलिंग आहे.

**क्रमांक २३ व २४ :** ही फारशी वैशिष्ट्यपूर्ण लेणी नाहीत. क्रमांक चोवीसच्या लेण्यात चार शिवमंदिरे असून त्यांत योनिपीठे आहेत. याला `तेली की घाणी' असेही म्हणतात.

**क्रमांक २५ :** हे लेणे आकाराने विस्तृत असून मंडपात कुबेर, स्तंभावर शालभंजिका, छतावर गजलक्ष्मी व आतील छतावर सूर्य यांची शिल्पे आहेत. गर्भगृहासमोर दोन द्वारपाल असून सूर्याचे शिल्प कलात्मक आहे.

**क्रमांक २६ :** याची रचना एकविसाव्या लेण्यासारखीच आहे. दर्शनी भागात घटपल्लवयुक्त स्तंभ, दोन अर्धस्तंभ व प्रवेशद्वारात गजमुखे कोरलेली आहेत. याच्या प्रवेशद्वारापाशी द्वारपालांची दोन भव्य शिल्पे आहेत.

**क्रमांक २७ :** हे लेणे `जानवसा' लेणे अथवा `जानवसा घर' म्हणून ओळखले जाते. याच्या जवळच क्र. २९ चे `सीता की नहाणी' या नावाने संबोधले जाणारे लेणे शिव – पार्वती विवाहाचा शिल्पपट असल्याने या विवाहाच्या संदर्भात या लेण्याला जानवसा असे म्हणत असावेत.

सभामंडपाच्या दरवाजाच्या एका बाजूस बलराम, एकानंशा व कृष्ण आणि दुसऱ्या बाजूस ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे मोठे शिल्पपट आहेत. शिवाय शेषशायी विष्णू, वराह यांच्या मूर्ती आहेत. याच दरवाज्याच्या दोन बाजूंस खिडक्या असून त्यांच्यावर महिषासुरमर्दिनीचे शिल्प आहे. गर्भगृहात फक्त अधिष्ठान आहे, मूर्ती नाही.

**क्रमांक** 28 **:** हे लेणे पावसाळ्यातील जवळच्या धबधब्यामुळे रम्य वाटते. लेण्याच्या दरवाजाच्या बाजूस गंगा, यमुना यांची भग्न शिल्पे असून सभामंडपात योगासनातील अष्टभुजा शाक्त देवी, गर्भगृहाशी संलग्न द्वारपाल आणि गर्भगृहात योनिपट आहेत. देवीच्या हातांत खड्ग, भुजंग, त्रिशूल, नरमुंड इ. आहेत.

**क्रमांक २९ :** हिंदू धर्मीय लेण्यांमध्ये `सीता की नहाणी' या नावाने हे लेणे (४५·११ X ४५·४१ मी.) प्रसिद्ध आहे. यातील शिल्पे भव्य असूनही कलाहीन आहेत. अग्रमंडपाच्या अधिष्ठानावर भव्य सिंहशिल्पे आहेत, तर भिंतीवर रावणानुग्रह आणि अंधकासुरवध यांचे शिल्पपट आहेत. सभामंडपाच्या मागील गर्भगृहात शिवलिंग आहे.

दक्षिणेकडील पार्श्वमंडपात शिव-पार्वती विवाह, अक्षक्रीडेत रमलेले शिव-पार्वती असून उत्तरेकडील पार्श्वमंडपात कमळावर पद्मासनात बसलेला लकुलीश शिव आहे. त्याचा उजवा हात व्याख्यानमुद्रेत असून त्याच्या डाव्या हातात लगुड (लाकडाचा दंड) आहे. जटामुकुट, वनमाला आणि यज्ञोपवीत ल्यालेली ही मूर्ती ऊर्ध्वरेतस अथवा ऊर्ध्वमेढ्र आहे. समोर अपूर्णावस्थेतील नटराज शिवाचे शिल्प आहे.

भव्यता, अग्रमंडप, सभामंडपादी विकसित वास्तुघटक आणि शिल्पांतील गतिमानता व चेहऱ्यांवरील विविध भाव या दृष्टींनी ही लेणी वैशिष्ट्य पूर्ण आहेत. तसेच या लेण्यांतून शाक्त, शैव व वैष्णव या तिन्ही पंथीयांचे शिल्पांकन दृग्गोचर होते. काही लेण्यांत भित्तिचित्रे आढळतात.

**जैन लेणी :** क्रमांक ३० ते ३४ ही जैन धर्मीयांची लेणी आहेत. ती मुख्यत्वे दिगंबर पंथीयांची आहेत.

**क्रमांक ३० :** हे लेणे (३९·६२ X २४·३८ मी.) म्हणजेच छोटा कैलास. हे कैलासप्रमाणेच द्राविड धर्तीचे मंदिर आहे. गोपुराच्या उजव्या आणि डाव्या भिंतींवर शिल्पे आहेत. डावीकडे प्रथम तीर्थंकर ऋषभनाथ यांची यक्षिणी चक्रेश्वरी असून तिचे वाहन गरुड आहे आणि तिने पद्म, चक्र, शंख, गदा व खड्ग ही आयुधे धारण केली आहेत. उजवीकडे

समभंगातील तीर्थंकरांच्या तीन मूर्ती आहेत. लेण्यात अग्रमंडप, मुख्य मंडप व गर्भगृह हे वास्तुघटक आहेत. अग्रमंडपाच्या पाठीमागील भिंतीवर सौधर्मेंद्र यक्षाच्या दोन नृत्यमूर्ती आहेत. सभामंडपाच्या भिंतीवर गंधर्वमिथुने कोरलेली आहेत. याच्या दरवाजाच्या बाजूवर शंखनिधी आणि पद्मनिधी आहेत. गर्भगृहात महावीर यांची मुख्य मूर्ती असून बाजूला इतर तीर्थंकरांच्या प्रतिमा आहेत. त्यांत पार्श्वनाथ, गोमटेश्वर यांच्या मूर्ती लक्षणीय आहेत. परंतु उत्तरेकडील भिंतीत योगासनातील अष्टभुजा देवीची मूर्ती आहे. तिने उजव्या तीन हातांत अनुक्रमे त्रिशूळ, पाश, खड्ग धारण केले असून चौथा हात वरदमुद्रेत आहे. डाव्या हातांत पाश, घंटा असून एक हात अभयमुद्रेत आहे. अग्रमंडपात गदाधारी द्वारपाल असून छतावर भित्तिचित्रांचे अवशेष आढळतात. या लेण्याजवळ एक अपूर्ण लेणे आहे. या लेण्यात चतुर्मुख तीर्थंकर, छतावरील कमलपुष्प, पूर्णघट कोरलेले स्तंभ, अग्रमंडपातील कक्षासन आणि जोत्यावरील हत्ती अशी मोजकी शिल्पे आढळतात.

**क्रमांक ३१ :** क्रमांक ३१ ते ३४ ही लेणी एकमेकांस लागून खोदलेली आहेत. पहिल्या लेण्याच्या दर्शनी भागात चार खांब आहेत. सभामंडपात गोमटेश्वराची कार्योत्सर्गमुद्रेत उभी मूर्ती असून तिच्या समोर पार्श्वनाथ तीर्थंकराची प्रतिमा आहे. गर्भगृहात महावीराची ध्यानमुद्रेतील प्रतिमा असून वर पुष्पमाला घेतलेले गंधर्व विहार करीत आहेत. गर्भगृहाच्या बाहेर डाव्या बाजूस वटवृक्षाखाली असलेली मातंगाची, तर उजव्या बाजूला आम्रवृक्षाखाली सिंहासनारूढ सिद्धायिकेची मूर्ती कोरली आहे. जैन परंपरेप्रमाणे महावीर तीर्थंकराशी मातंग यक्ष म्हणून, तर सिद्धायिका शासनदेवता म्हणून निगडित आहेत.

**क्रमांक ३२ :** हे इंद्रसभा नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्या प्रांगणात मधोमध एका उंच चौथऱ्यावर तीर्थंकराचे सर्वतोभद्र प्रतिमागृह आहे. या प्रतिमागृहाला चारही बाजूंस दोन खांब असलेले अग्रमंडप आहेत. मंदिरावर द्राविड पद्धतीचे शिखर आहे. मंदिरनिर्मितीचे तंत्र कैलासाप्रमाणेच म्हणजे वरून खाली आहे. प्रांगणाच्या तिन्ही बाजूंस दुमजली लेणी कोरलेली आहेत. या लेण्यांच्या कक्षासनांवर कैलासाशी साम्य दर्शविणारी गजमुखे कोरलेली आहेत. प्रांगणाच्या दक्षिण आणि उत्तरेकडील भिंतींत पार्श्वनाथ, गोमटेश्वर, सिद्धायिका, मातंग यक्ष आणि इतर काही तीर्थंकर यांची शिल्पे आहेत.

मुख्य लेण्यात गेल्यावर अग्रमंडपात एक महत्त्वाचा पुरावा दिसून येतो. एका खांबावर तांबड्या गेरूने तीर्थंकर प्रतिमेचे रेखाटन केल्याचे दिसते. त्यानुसार मूर्ती घडविली जाई, असे स्पष्ट होते. याच मंडपातील दुसऱ्या एका खांबावर तीर्थंकार प्रतिमेखाली `नागवर्मकृत प्रतिमा' असा उत्कीर्ण लेख असून, दुसऱ्या एका खांबावर `श्री सोहिलब्रह्मचारिणी शांतिभट्टारक प्रतिमेयम्' असा लेख शांतिनाथ तीर्थंकराच्या प्रतिमेखाली आहे. याच लेण्याच्या तळमजल्याच्या गर्भगृहात महावीराची मूर्ती आहे. वरच्या मजल्यावर चढताना अर्ध्या वाटेतील प्रतिमागृहात महावीर, पार्श्वनाथ, गोमटेश्वर, सिद्धायिका आणि मातंग यक्ष यांच्या प्रतिमा आहेत तर वरच्या मजल्यावरील अग्रमंडपात मातंग आणि सिद्धायिका यांच्या समोरासमोर भव्य प्रतिमा आहेत. मंडपाचे खांब घटपल्लव आणि इतर शिल्पे यांनी सुशोभित केले आहेत, छतावर कमळ कोरलेले आहे. मंडपाच्या मागील भिंतीत पार्श्वनाथ, महावीर व गोमटेश्वर यांच्या प्रतिमा आहेत. या मंडपाच्या छतावर चित्रकारीचे पुसट अवशेष दिसतात.

**क्रमांक ३३ :** `जगन्नाथ सभा' ह्या नावाचे हे लेणे दुमजली आहे. तळमजल्यातील लेण्यात मातंग आणि सिद्धायिका यांची उत्कृष्ट शिल्पे आहेत. वरच्या मजल्यावर बारा खांबांचा मंडप असून भिंतीत व गर्भगृहात तीर्थंकर प्रतिमा आहेत. महावीर प्रतिमेलाच जगन्नाथ समजून या लेण्याला त्याचे नाव दिले गेले असावे.

**क्रमांक ३४ :** हे शेवटचे जैन लेणे अग्रमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह या योजनेचे असून, येथेही तीर्थंकर आणि गोमटेश्वर ह्यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. काही अपवाद वगळल्यास या लेण्यांतील मूर्ती साचेबंद वाटतात. विशेषतः तीर्थंकरांच्या मूर्तींत विविधता नसून निर्जीवपणा जाणवतो.

**इतर लहानसहान लेणी :** वर वर्णन केलेल्या मुख्य लेणीसमूहाव्यतिरिक्त वेरूळला याच लेण्यांच्या परिसरात इतरही छोटीछोटी लेणी आहेत. उदा., `तेली की घाणी' (क्र. २४) जवळ दोन लेणी असून त्यांत गर्भगृहात त्रिमूर्ती, तर मंडपात पंचाग्निसाधन करणारी उमा कोरलेली आहे. याशिवाय गणेशमूर्तीही आहे.

लेणे क्रमांक २९ (सीता की नहाणी) च्या वरच्या बाजूस डोंगर-पठारावर `गणेश लेणी' या नावाने संबोधल्या जाणाऱ्या लेण्यांचा समूह आहे. यांतील एकात गर्भगृहात शिवलिंग असून या लेण्याचे वैशिष्ट्य असे, की याच्या मंडपाच्या छतावर लिंगोद्‌भव शिव, समुद्रमंथन यांची भित्तिचित्रे आहेत. दुसऱ्या एका लेण्यात गर्भगृहात गणेशाची मूर्ती आहे, तर इतर काहींमध्ये महेशमूर्ती उत्कर्णी केलेल्या आहेत. आणखी काही अंतरावर `योगेश्वरी' नावाच्या लेण्यांचा समूह आहे. ही लेणी आकाराने लहान असून त्यांत शिवलिंग आणि महेशमूर्ती आढळून येतात. ही सर्व लेणी, त्याचप्रमाणे यांतील चित्रकारी अकराव्या-बाराव्या शतकांतील असावी. स्थापत्य आणि शिल्प यांच्यातील जोम नष्ट झाल्याचा हा काळ होता.

**अजिंठा :**

महाराष्ट्रातील प्राचीन शैलगृहे व भित्तिचित्रे यांचे एक जगप्रसिद्ध स्थळ. अजिंठा हा गाव लेण्यांजवळ ६ किमी. च्या आत डोंगरमाथ्यावर असल्यामुळे इंग्रज लेखकांच्या लेखांत यांचा उल्लेख 'अजिंठ्याची लेणी' असा असला, तरी तेथील स्थानिक लोक त्यांचा उल्लेख 'फर्दापूरची लेणी' असाच करतात. औरंगाबाद जिल्ह्यात उत्तरेस सु. १०८ किमी. वर व फर्दापूर या गावापासून दक्षिणेस सु. पाच किमी. वर सह्याद्री पर्वताच्या सातमाळ रांगेतील इंध्याद्री शाखेत ही लेणी खोदलेली आहेत. ह्यांचा शोध १८१८ मध्ये आकस्मिकपणे लागला असला, तरी निश्चितपणे १८१९ च्या एप्रिल महिन्यात स्मिथ ह्या अधिकाऱ्याला ठाऊक झाली असे दहाव्या लेण्यातील लेखावरून आता स्पष्ट झाले आहे. येथील चित्रशैलीचा प्रभाव नंतरच्या भारतातील व भारताबाहेरील चित्रकलेवरही पडलेला दिसून येतो. यावरून येथील कला प्रेरणाशील होती व अद्यापही आहे हेनिर्विवाद आहे.

येथे एकूण तीस बौद्धधर्मीय लेणी (गुंफा) आहेत. त्यांतील ९, १०, १९, २६ व २९ ही चैत्यगृहे असून बाकीचे पंचवीस विहार आहेत. कालखंडाच्या दृष्टीने या लेण्यांपैकी ९ व १० चैत्य आणि ८, १२, १३ व ३० हे विहार हे हीनयान पंथाचे असून त्यांचा काल इ.स.पू. २ रे शतक ते इ.स. २ रे शतक असा आहे. बाकीची लेणी महायान पंथाची असून येथील अवशिष्ट शिलालेखांवरून असे दिसून येते, की ती ⇨वाकाटक वंशातील शेवटचा ज्ञात सम्राट हरिषेण ह्याच्या कारकीर्दीत (सु. ४७५-५००) कोरली गेली असावीत. हीनयान पंथाच्या लेण्यांची स्थापत्यशैली आधीची वाटते. यांपैकी ९ व्या व १० व्या चैत्यगृहांच आलेख गजपृष्ठाकृती आहेत आणि मंडपाच्या चापाकार बाजूंत स्तूप कोरलेला आहे. या कालखंडातील विहारांत खांब नाहीत. फक्त यांत तिन्ही बाजूंना भिक्षूंना राहण्यासाठी खोल्या खोदलेल्या आहेत. या समूहातील लेण्यांत दहावे लेणे सर्वांत प्राचीन आहे. त्यात बुद्धप्रतिमा नाही. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी यूआन-च्वांग अजिंठ्यास जरी येऊन गेला नाही, तरी त्याने या लेण्याचे वर्णन लिहून ठेवले आहे. एका विहारातील कोरलेल्या भव्य हत्तीचा उल्लेख करून तो अचल ह्या पश्चिम भारतातील भिक्षूने बांधला, असे त्याने नमूद करून ठेवले आहे. २६ व्या लेण्यांतील शिलालेख, हे शैलगृह आचार्य अचल ह्याचे आहे, असे सांगतो.

इतर शैलगृहांप्रमाणे अजिंठ्याची शैलगृहे त्यांतील वास्तुकलेसाठी आणि मूर्तिकलेसाठी प्रसिद्ध असली, तरी येथील लेणी मुख्यत्वे चित्रकलेकरिता प्रख्यात आहेत. चित्रे काढण्यासाठी भिंतींवर प्रथम माती, शेण, भाताचा भुस्सा किंवा ताग आणि तूस ह्यांच्या वस्त्रगाळ मिश्रणाचा गिलावा चढवीत आणि त्यावर चुन्याचा एक हलका हात मारून किंवा संदलाचा चकचकीत पातळ थर चढवून त्यावर गेरूने प्रथम चित्रांची बाह्यरेषा रेखाटून त्यात क्रमाक्रमाने रंग भरीत. अजिंठ्याच्या चित्रकारांनी मुख्यतः पांढरा, काळा, पिवळा, हिरवा, तांबडा आणि निळा हे रंग आपल्या चित्रकलेत वापरले आहेत. यांपैकी पुष्कळसे रंग नैसर्गिक पदार्थांपासून केलेले आहेत व अशी मूलरंगद्रव्ये अजिंठ्याजवळच सापडतात. लाखेपासून केलेल्या कार्बनी तांबड्या रंगासारखे काही उडणारे रंगही वापरले असावेत कारण काही चित्रांतील मानवी आकृतींच्या ओठांवरील लाल रंग नाहीसा झालेला दिसतो. फक्त निळा रंग (लाजवर्दी) तेवढा आयात केलेला असावा.

सरसाचा रंगबंधक म्हणून बहुधा वापर केलेला असावा. भित्तिचित्रांशिवाय मूर्तिकामही रंगविलेले असावे. कारण अशा कामाचे अवशेष आजही आढळतात.

चित्रप्रसंग बव्हंशी जातकादी ग्रंथांतील बुद्धाच्या कथांतून निवडलेले आहेत. याशिवाय बौद्ध धर्मग्रंथांतून वर्णिलेल्या काही देवदेवता, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा आणि निरनिराळे प्राणी यांचीही चित्रे आहेत. छतांवर आणि स्तंभांवर वेलबुट्टीचे अप्रतिम नमुने चितारलेले आढळून येतात. अजिंठ्याच्या स्त्रियांच्या चित्राकृती अगदी अपूर्व आहेत. गौरवर्णा आणि श्यामा, मुग्धा, अर्धस्फुटिता, प्रौढा आणि कुमारिका, सुस्तनी आणि पृथुल नितंबिनी अशा, आभूषणे धारण करणाऱ्या, विविध स्त्रिया चित्रकारांनी इथे मूर्त केल्या आहेत. काही लेणी अपूर्ण आहेत व काही पडझड झाल्यामुळे खराब झाली आहेत. सुस्थितीत असलेली लेण्यांची वैशिष्ट्ये खाली दिली आहेत :

**क्रमांक १:** याचा आलेख चतुष्कोनी असून गर्भगृहात बुद्धाची प्रतिमा कोरलेली आहे. ओवरीच्या स्तंभावर अप्रतिम नक्षीकाम आहे. मंडपाच्या तिन्ही बाजूंस भिक्षूंकरिता खोल्या खोदलेल्या असून मंडपाच्या भिंतींवर चित्रे आहेत. ही चित्रे जातकादी कथांतील असून त्यांतील पद्मपाणीचे चित्र प्राचीन भारतीय चित्रकलेचा एक सर्वोत्कृष्ट नमुना समजले जाते. येथील श्यामल वर्णाची राजकन्या आणि अप्सराही आकर्षक आहे. दुसऱ्या एका लहान चित्रात एक इराणी व्यक्ती सुरापान करीत असल्याचे दर्शविले असून काही विद्वानांच्या मते ती व्यक्ती इराणचा राजा दुसरा खुश्रु आणि त्याच्या शेजारी बसलेली स्त्री ही त्याची राणी शिरीन असावी. मात्र हे मत सर्वमान्य नाही. आणखी एका चित्रात दरबारातील दृश्य असून त्यात राजा काही परकीयांचे स्वागत करीत आहे, असे दृश्य आहे. हा राजा चालुक्य नृपती दुसरा पुलकेशी असावा व तो दुसऱ्या खुश्रूच्या दूतवासींचे स्वागत करीत आहे, असे काही विद्वानांचे मत आहे. तथापि तेही मत सर्वमान्य नाही. ह्या लेण्यातील गर्भगृहातील बुद्धाचे एक शिल्प वैशिष्ट्यपूर्ण असून त्यात बुद्धाचे स्मित, विषाद आणि ध्यान असे तीन स्पष्ट भाव विभिन्न कोनांतून पाहिले असता दिसतात. ह्याशिवाय लेण्याच्या मागील बाजूस असणाऱ्या पडवीच्या स्तंभावर एक मुख व चार धडे असणाऱ्या हरिणाचे चमत्कृतिपूर्ण शिल्प आहे.

**क्रमांक २:** ह्याची रचना क्रमांक १ सारखीच आहे. परंतु ह्याच्या अंतराळाच्या दोन्ही बाजूंस लहान मंदिरे आहेत. त्यातील एकात बुद्धाची भव्य मूर्ती आणि दुसऱ्यात दोन यक्षांच्या भव्य मूर्ती आहेत. बुद्धाची मूर्ती असलेल्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या भिंतीवर बुद्धाच्या शेकडो प्रतिमा असून शेजारच्या स्तंभांची स्तंभशीषे कमळाकृती आहेत. सभागृहाच्या छतांवर एक मोठे वर्तुळ असून त्याच्या सभोवती चार किन्नरांच्या सुंदर आकृत्या आहेत. वर्तुळात फुलांचे अलंकृत रचनाबंध असून इतर अनेक भौमितिक आकृत्या आढळतात. येथील सर्व स्तंभ नक्षीदार आहेत. ह्या लेण्यात मुख्यत्वेहंसजातक,विधुरपंडितजातक इत्यादींतील प्रसंग असून अर्हत, किन्नर ह्यांच्या चित्राकृती आहेत. याशिवाय नागराजा, त्याचे गण, तसेच हत्ती, घोडे आदी प्राणी दाखविले आहेत. ह्या लेण्यात काही महत्त्वाचे शिलालेख आहेत.

**क्रमांक४:** सर्व विहारांत हा विहार मोठा आहे. त्याला अठ्ठावीस खांब आहेत. व्हरांड्याला आठ अष्टकोनी स्तंभ असून सर्वांवर नक्षीकाम केले आहे. मधले दार नक्षीयुक्त असून चौकटीवर असंख्य मिथुन-आकृत्या आहेत. त्यांच्याजवळचे बुद्धाच्या शांतिपाठाचे कोरीव काम लक्षवेधक आहे.

**क्रमांक ६:** हे एकच दोनमजली लेणे आहे. ह्यातील वास्तूंची बरीच नासधूस झाली आहे. वरच्या मजल्यातील द्वारावरील चित्रे प्रेक्षणीय आहेत. येथील काही खांब नादवाही आहेत.

**क्रमांक७:** हे विलक्षण विहार लेणे असून ह्यात सभागृह नाही. व्हरांड्याची सुरवात दोन कमानींनी झाली असून त्याचे खांब घारापुरीतील खांबांसारखे आहेत. त्यांवर कोरीव काम आहे. त्यांत बुद्धाचे एक पद्मासन घातलेले व आशीर्वादासाठी उजवा हात वर केलेले शिल्प आहे. आतील खोलीच्या डाव्या भिंतीवर बुद्धाच्या निरनिराळ्या अवस्थांतील असंख्य आकृत्या कोरलेल्या आहेत.

**क्रमांक ९:** हा चैत्य इ.स.पू. पहिल्या शतकातील आहे. मंडपाची मागील बाजू अर्धवर्तुलाकृती असून त्या भागात स्तूप कोरलेला आहे. चैत्याच्या दर्शनी भागाच्या दोन्ही बाजूंस भिंतींवर वरदहस्त मुद्रायुक्त बुद्धाच्या दोन भव्य मूर्ती आहेत आणि चैत्याच्या डाव्या खिडकीशेजारी वरदहस्त बुद्धाच्या उभ्या दोन मूर्ती आहेत.

चैत्यगृहास एकूण २१ दगडी स्तंभ असून ते अष्टकोनी व अनलंकृत आहेत. स्तंभांवर बुद्धाच्या आकृत्या चितारलेल्या आहेत. चैत्यगृहात अनेक चित्रे काढलेली दिसतात. स्तूपावर बहुतकरून पूर्वी लाकडी छत्री असावी, असे तेथील छत्रीच्या खोबणीच्या खुणेवरून वाटते. सर्व लेण्यात चित्रांचे दोन थर असून वरच्या थरातील चित्रे सहाव्या शतकातील आहेत. मात्र खालच्या थरातील चित्रे पहिल्या शतकातील असावीत.

**क्रमांक १०:** हे लेणे इ.स.पू. दुसऱ्या शतकातील आहे. हे अंजिठ्यातील सर्वांत प्राचीन लेणे असून ह्याचा विस्तार क्र.९ पेक्षा थोडा मोठा आहे. त्याच्या छतावर पूर्वी लाकडी तुळ्या व पटई होती. ह्याचा दर्शनी भाग (घरमुख) मोठ्या चैत्यगवाक्षामुळे प्रेक्षणीय वाटतो. तेथील अवशिष्ट लेखानुसार तो भाग (घरमुख) करहाटक (कराड) येथील वसिष्ठ पुत्राचे इ.स.पू. दुसऱ्या शतकातील दान असावे. यातही चित्रांचे दोन थर असून त्यांतील खालच्या थरात राजाराणी बोधिवृक्षाच्या पूजेस लवाजम्यासह जात असल्याचा प्रसंग चितारलेला आहे. येथे चितारलेल्या वेशभूषा सांची स्तूपाच्या दक्षिण द्वारावरील वेशभूषेसारख्या वाटतात. त्याशिवाय छद्दंत-जातकातील निर्दिष्ट आदिवासी नागांचीही चित्रे सुंदर आहेत.

**क्रमांक १६:** स्थापत्य, शिल्प आणि चित्रकला यांचे उत्कृष्ट नमुने ह्या लेण्यात पहावयास मिळतात. या लेण्यातील अवशिष्ट लेखात, हे लेणे वाकाटक नृपती हरिषेण (सु. ४७५—५००) याचा मंत्री वराहदेव ह्याने शिल्प व चित्रांनी सुशोभित करून बौद्ध भिक्षूंना दान केले, असा मजकूर आहे.

यालेण्यात बुद्धाची प्रलंबपाद आसनातील भव्य मूर्ती असून येथील चित्रांतील ग्लानी येऊन मूर्च्छित झालेल्या सुंदरीचे चित्र अप्रतिम समजले जाते. याशिवाय येथेहस्तिजातक, महा-उम्मगजातकादीकथांतील प्रसंग चित्रित केलेले असून तीरशिल्पाकृत्यांत अवकाशगामी अप्सरा दाखविलेल्या आहेत. त्यांच्या गळ्यातील अलंकार, अंगठ्या, बांगड्या व केशरचनेचे प्रकार ह्यांतून तत्कालीन सौंदर्यप्रसाधनाची कल्पना येते.

**क्रमांक १७:** हे लेणे ऋषिक राजाने आपल्या भावाच्या स्मरणार्थ खोदले असावे, असे एक मत आहे. ते प्रामुख्याने बौद्ध भिक्षूंसाठी निवासस्थान म्हणून खोदले. वाकाटक हरिषेणाच्या एका मांडलिकाने ते दान केल्याची माहिती या लेण्यातील लेख सांगतो. या लेण्यातील चित्रांत मुख्यत्वे जातककथांपैकी मानवी सद्‌गुणांच्या कथांतील चित्रे चितारली आहेत. व्हरांड्याच्या छतांवर पुष्पालंकाररचना चित्रित केलेल्या असून व्हरांड्याच्या मागील बाजूच्या डाव्या भिंतीवरविश्वंतर जातकातील कथा चितारलेली आहे. त्यात विश्वंतर भिक्षा देत असून अनेक ब्राह्मण ती गोळा करण्यासाठी जमलेले दिसतात. पडवीच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या भिंतीवर छद्दंत-जातककथेतील चित्रे असून त्यात कोचावरील राणी, तिच्या दासदासी, शेजारच्या चित्रातील प्रशांत सरोवर, सहा दातांचा हत्ती व त्याच्या पाठीवरील लांडगा ह्यांचे चित्र आहे. यात आणखीमहाकपी, हंस, विश्वंतर, सुत्तसोमआदी जातककथांतील चित्रे चितारलेली आहेत. बुद्धाचे महाबोधिप्राप्तीनंतरचे चित्र असून त्यात शांत, तेजस्वी बुद्ध हातात भिक्षापात्र घेऊन उभा आहे आणि त्याचे स्वागत करण्यासाठी त्याची पत्नी यशोधरा व मुलगा राहुल पुढे सरसावले आहेत, असे चित्र आहे. ह्याशिवाय येथील प्रसाधनाचे चित्र अप्रतिम असून त्यातील दांपत्यांचा पेहराव व अंलकार यांवरून तत्कालीन संस्कृतीसंबंधी खूपच माहिती मिळते.

**क्रमांक १९:** हा पाचव्या शतकातील चैत्य कोरीव कामाने भरलेला आहे. त्यात दोन लहान मंदिरे आहेत. ह्या चैत्याचा दर्शनी भाग मोठा असावा, पण तो पडलेला आहे. उजव्या बाजूच्या गर्भगृहात वर्तुळाकार स्तंभ असून त्यावर फिरत्या खोबणी खोदल्या आहेत आणि स्तंभशीर्षे चौकोनी असून त्यांवर पुष्पालंकृत रचना व फळांचे शिल्पपट्ट आहेत. मंदिराच्या मागील भिंतीवर प्रलंबपाद आसनात सिंहासनावर बसलेली बुद्धाची एक मूर्ती आहे. तो कमळात आपले पाय ठेवून विश्रांती घेत आहे, असे दृश्य चित्रित केले आहे. चैत्यगवाक्ष कोरलेले आहे. गवाक्षाच्या दोन्ही बाजूंस यक्षमूर्ती असून

चैत्यगृहाच्या भिंतीवर बुद्धप्रतिमा रंगविल्या आहेत अनेक मिथुन-आकृत्याही तेथे आढळतात. क्रमांक १७ प्रमाणेच येथे बुद्ध, यशोधरा आणि राहुल ह्यांची चित्रे आहेत. त्याच्या उजवीकडे बुद्धाचे भिक्षाध्यान, नागराजाची मूर्ती, नागराज व राणीची मूर्ती उच्च शिल्पकलेची निदर्शक आहे. येथील स्तूप चिनी पॅगोडाप्रमाणे आहे. स्तूपाच्या खालच्या भागावर विविध आकृत्या कोरलेल्या आहेत. समोर बुद्धाची उभी, अभयमुद्रादर्शक मूर्ती असून ती तोरणामध्ये खोदलेली आहे. स्तूपाचा आकार अर्धअंडाकृती आहे.

**क्रमांक २०:** हा पाचव्या शतकातील विहार आहे. मुख्य सभागृहाच्या प्रवेशद्वारावरील तोरण नक्षीदार असून त्याच्या दोन्ही बाजूंस गवाक्षे आहेत. उजवीकडील गवाक्षावर बुद्धाची प्रतिमा आहे. सभागृहाच्या छतावर पुष्पालंकृत रचना व भौमितिक आकृत्या आहेत. सभागृहातबुद्धाची धर्मचक्रमुद्रेतील आकृती असून त्याखाली दोन हरणांच्या आकृत्या व धर्मचक्र दिसते.

**क्रमांक २१ :** हा सहाव्या शतकातील विहार असून ह्यातील व्हरांडा जमीनदोस्त झाला आहे. मंदिराच्या शीर्षपादातील पटांमध्ये नागराजा,राणी आणि त्यांचे सेवक ह्यांच्या आकृत्या काढलेल्या आहेत. शिल्पपट्टातील मोत्यांच्या माळा अप्रतिम असून सातव्या शतकातील अलंकारांच्या त्या निदर्शक आहेत. स्तंभशीर्षांवर राजा राणी, उडत्या आकृत्या, स्तूप आणि पुजारी कोरलेले दिसतात.

**क्रमांक २६ :** ह्या चैतन्यगृहाची रचना क्र. १९ प्रमाणेच आहे. ह्याचा दर्शनी भाग मोठा होता, तथापि तो पडलेला आहे. स्तूपावर कोरीव बुद्धमूर्ती आणि भिंतीवर बुद्धजीवनातील विविध प्रसंग कोरलेले आहेत. मारविजय आणि बुद्धनिर्वाण ही ह्या लेण्यातील शिल्पे उदात्त कलेची साक्ष पटवितात. बुद्धाला महानिर्वाण प्राप्त झाल्याचे दाखवून बुद्धाच्या आडव्या पसरलेल्या प्रचंड मूर्तीच्या वरच्या बाजूस मृदंगादी वाद्ये वाजत आहेत असे दृश्य कोरले आहे. बुद्धमूर्ती रेखीव नसली, तरी भव्य आहे. ह्याच लेण्याच्या दर्शनी भागावर अश्मकराजाचा मंत्री भव्वीराज याने हे बुद्धमंदिर बुद्धभद्रभिक्षूस दान केल्याचा लेख आहे. अक्षरवटिकेनुसार या लेखांचा काल ५-६ वे शतक असावा.

**क्रमांक ३० :** हे दुसऱ्या शतकातील हीनयान पंथाचे लेणे असावे. येथील एक शपथस्तूप हे अपोत्थित शिल्पकाम आहे. तसेच येथे प्रारंभीच्या अक्षरवटिकेत लिहिलेला एक शिलालेख सापडला असून अद्यापि त्यातील मजकूर ज्ञात झालेला नाही. ही गुही अत्यंत साधी असून तिचे सभागृह लहान आहे. सभागृहाच्या डाव्या बाजूस तीन लहान पडव्या असून पुढच्या उजव्या बाजूच्या भिंतीस लागून दोन दगडी बिछाने आहेत. पडवीच्या दारांवर व गवाक्षाच्या वरच्या भागावर काही किरकोळ नक्षीकाम केलेले आहे.

अजिंठ्याच्या लेण्यांतील बरीचशी चित्रकला आज आपणापुढे नाही. क्रमांक १, २, १६, १७ व अगदी थोड्या प्रमाणात क्रमांक १९ याच लेण्यांतील चित्रकला अद्यापि बव्हंशी अबाधित राहिली आहे. येथील चित्रप्रसंग जरी बुद्धजीवनावर आधारित असले, तरी त्या सर्वांतून तत्कालीन समाजजीवनाच्या विविध अंगांवर प्रकाश पडतो. अजिंठ्याच्या चित्रांचा एक विशेष म्हणजे, त्यांतील विविधता इतकी विपुल आहे, की तिच्यातून अपवादादाखल एखाद-दुसराच भाव आणि पेहराव निसटला असेल. तत्कालीन वास्तू, वेशभूषा, अलंकार, खेळ, मनोरंजनाची साधने, वाद्ये, आयुधे, फर्निचर आणि पात्रे ह्यांच्या विविधतेवरून समाजजीवन सुखी आणि समृद्ध होते, याबद्दल शंका रहात नाही. गुप्त—वाकाटक काळातील सुवर्णयुगाची साक्ष यावरून पटते. चित्रांप्रमाणेच शिल्पेही विविध तशीच भावपूर्ण आहेत. बुद्धाचे परिनिर्वाण, नागदंपतीचे शिल्प, मकरमुखे, शालभञ्जिका आणि मिथुने यांबरोबर सुबक नक्षीकामही रसिकतापूर्ण शिल्पकला दर्शविते. अजिंठ्याच्या चित्रांनी चित्रकलेच्या इतिहासात अढळपद मिळविले आहे.

भारतीय पुरातत्त्वखात्याच्या अखत्यारीत असलेली अजिंठ्याची शिल्पे आणि चित्रकला सुरक्षेचे महत्त्वाचे प्रश्न उभे करीत आहे. त्रुटित स्तंभांची पुन्हा डागडुजी करणे, निखळलेले भाग पुन्हा जसेच्या तसे उभे करणे, खडकाच्या चिरांतून दाबाने सिमेंट भरणे, ठिसूळ झालेला खडकाचा भाग दूर करणे वा त्यास बळकटी आणणे, जुन्या पायऱ्यांची निगा राखणे व झिरपणारे पाणी बंद करून त्यासाठी पन्हाळ्या करणे इ. गोष्टी वारंवार व अचूकपणे कराव्या लागतात.

याशिवाय भित्तिचित्रांचे जतन हा एक नाजूक व जबाबदारीचा प्रश्न आहे. काही काळापूर्वी सर्व चित्रांवर, त्यांचे योग्य जतन होईल या भावनेने एक जाड व्हार्निशचा थर देण्यात आला होता मात्र त्यामुळे चित्रांचे जतन न होता, काही कालांतरानंतर ही सर्व चित्रे अत्यंत अंधूक झाली. यावरून धडा घेऊन भारत सरकारने तज्ञांच्या शिफारशींनुसार हे थर रासायनिक प्रक्रियेने दूर करून बरीचशी भित्तिचित्रे सुस्पष्ट करण्यात यश मिळविले आहे. या चित्रांचे संरक्षण आजमितीस अत्याधुनिक पद्धतीने आणि साधनांनी करण्यासाठी वेगळी खास यंत्रणा आहे.

**सित्तन्नवासल :**

दक्षिण भारतातील एक जैन कलाक्षेत्र. ते तमिळनाडू राज्यात पुदुकोट्टईच्या वायव्येस, त्याच जिल्ह्यात सु. १६ किमी.वर पर्वतश्रेणीत वसले आहे. जैन आचार्यांचे हे इ. स. पू. दुसऱ्या शतकापासून इ. स. नवव्या शतकापर्यंत उपासनास्थान होते. याच्या परिसरात नर्तमलै, मलैयडीपट्टी वगैरे अन्य स्थाने आहेत. सित्तन्नवासल हा शब्द सिद्‌धानां वासः या संस्कृत शब्दांचे रुपांतर सिद्‌घण्णवास या प्राकृत रुपात होऊन त्याचेच तमिळ अपभ्रंश रुप सित्तन्नवासल झाले असावे, असा तज्ज्ञांचा कयास आहे. या व्युत्पत्तीवरुन हे स्थान जैन यतींच्या तपश्चर्येसाठी निर्मिले असावे असे दिसते. येथे पल्लव राजा पहिला महेंद्रवर्मा (कार. ६००—६२५) याने एक वैशिष्ट्यपूर्ण मंडपसदृश गुहा-मंदिर खोदले. ते एका सलग पाषाण पर्वतातून कोरुन काढलेले असून महेंद्रवर्माने डोंगर पोखरुन लेणी खोदण्याची प्रथा आपल्या राज्यात सुरु केली होती. सित्तन्नवासलच्या या जैन गुहा-मंदिरात अनेक कोरीव लेख आहेत. त्यांवरुन येथील मूर्ती आणि भित्तिचित्रे यांच्याविषयी विश्वसनीय माहिती मिळते. या मंदिराची लांबी ३० मी. असून रुंदी १५ मी. आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून दर्शनी आयताकार मंडपात चार स्तंभ आहेत. त्यांपैकी दोन पूर्ण स्तंभ असून त्यांवर मूर्तिकाम आहे. उर्वरित दोन अर्धस्तंभ (भित्तिस्तंभ) आहेत. त्यामागे चौकोनी गर्भगृह आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीत देवकोष्ट (देवळ्या) असून दक्षिणेकडील देवकोष्टात अपोत्थित उठावात खोदलेली बैठी पार्श्वनाथ तीर्थंकरांची मूर्ती आहे. त्याखाली कोरीव लेख असून त्यात उलोकादित्तन (लोकादित्य) असा पार्श्वनाथांचा उल्लेख आहे. उत्तरेकडील देवकोष्टात ध्यानमुद्रेत जैन आचार्यांची प्रतिमा असून, शेजारच्या स्तंभावर लेख कोरला आहे. त्यात तिरुवाशिरियन (श्री आचार्य) असा उल्लेख आहे. दोन्ही लेख नवव्या शतकातील आहेत. मागच्या भिंतीवर तीन मूर्ती देवकोष्टकांत असून त्यांपैकी दोन तीर्थंकरांच्या व एक चक्रवर्तीन (आचार्य) यांची आहे. याशिवाय मंडपाच्या दर्शनी भागातील दक्षिण कोपऱ्यात खोदलेल्या कोरीव लेखात पांड्य वंशातील राजा श्रीमार श्री वल्लभ (कार. ८१५—८६२) व जैन आचार्य इलङ्ग गौतममाङ्ग यांनी या गुहा-मंदिराची डागडुजी केल्याचा तसेच अर्धमंडपाची पुनर्बांधणी आणि सुशोभन केल्याचा उल्लेख आहे. याशिवाय त्यांनीच हा मुखमंडप बांधला आणि एक उंच मानस्तंभ उभा केला. काही तज्ज्ञ या गुहा-मंदिराच्या निर्मितीचे श्रेय पांड्य राजांना देतात.

या गुहा-मंदिराच्या डाव्या-उजव्या बाजूस मानवी उंचीच्या पूर्णाकृती दोन समभंगातील तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. या वास्तव व आकर्षक आहेत. या लेण्यांत अजिंठ्याप्रमाणे सर्वत्र चित्रे रेखाटण्याची योजना असावी, असे भिंतीवर लावलेल्या पातळ गिलाव्यावरुन व अवशेषांवरुन वाटते मात्र काही चित्रेच अवशिष्ट आहेत. त्यांपैकी व्हरांड्याच्या तक्तपोशीवर एक नयनरम्य चित्र असून ते सुस्थितीत अवशिष्ट आहे. या चित्राचा विषय सरोवर असून त्यात कमळाची पाने, फुले, मासे, हंस, बदके आदी दिसतात. यांशिवाय काही पक्षी तसेच काही फुले वेचणारी माणसे आहेत. ह्यांचे चित्रीकरण प्रमाणबद्‌घ व वास्तव असून त्यांचे चेहरे प्रसन्न आहेत. यांशिवाय या भित्तिचित्रांत तीन पुरुषाकृती आहेत. या पुरुषांच्या हातात कमलपुष्पे असून त्यांचा वर्ण तांबूस आहे मात्र एक पुरुष सुवर्णपीत वर्णाचा आहे. यातील पाणी सांकेतिक आरेखनाने दर्शविले आहे. मासे व हंस पाण्यात विहार करीत आहेत. उत्फुल्ल कमलपुष्पांचे देठ आणि पाने कलाकाराने रेखांकित केली असून कमलांचे देठ बाकदार व लयबद्‌घ आहेत. हे सरोवरदृश्य जैन पुराणातील एखाद्या कथेचा भाग असावे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

या सरोवरदृश्याव्यतिरिक्त येथे काही नृत्यांगना, सुरसुंदरी यांची चित्रे असून एक शाही दांपत्य (राजाराणी) रेखाटले आहे. डावा हात दंडमुद्रेत आणि उजवा हात पताकामुद्रेत अशी नृत्य आविर्भावात असलेली अप्सरा-सुरसुंदरी

उजवीकडे किंचित कलली असून तिची नजर त्याबाजूला रोखली आहे ती नटराजाच्या भुजंग-त्रासितक नृत्यमुद्रेत चितारली आहे, तर दुसरी एक नृत्यांगना (स्तंभावर रेखाटलेली) बाळकृष्णाच्या नृत्यमुद्रेत असून तिचा डावा हात आनंदाने पसरला आहे आणि उजवा हात पताका-मुद्रेत आहे. या स्त्रीप्रतिमा, त्यांची केशभूषा, अलंकार, केशसंभारातील फुले, मोती ही आभूषणे, तसेच सडपातळ अंगकाठी, उन्नत उरोज, सिंहकटी यांमुळे विलक्षण मोहक व आकर्षक वाटतात. या सुरसुंदरींच्या आकृती प्रमाणबद्‌घ असून त्यांच्या अंगप्रत्यंगांतून अभिव्यक्त होणारी लयबद्‌घ गती चित्रकाराने अत्यंत कौशल्याने रेखाटली आहे. चित्ररेखाटनात तांबडा, पिवळा, निळा, हिरवा, काळा, पांढरा इ. रंग वापरले असून ते स्थानिक जंगलातील वनस्पती व माती यांपासून बनविलेले आहेत. चित्रांतील रंगसंगती आणि मानवी आकृत्यांची प्रमाणबद्‌घता यांमुळे येथील प्रतिमा वास्तववादी भासतात. ही बहुतेक सर्व रेखाचित्रे आहेत. या भित्तिचित्रांमुळे सित्तन्नवासल हे एक पर्यटनस्थळ झाले आहे. या चित्रांचे तंत्र अजिंठा चित्रशैलीसारखेच असून त्या शैलीचा प्रभाव येथे जाणवतो. या गुंफा-मंदिराचा शोध प्राध्यापक जोव्हाऊ-डुब्रेल या पुरातत्त्वज्ञाने १९२० मध्ये लावला व त्यानंतर कलासमीक्षकांचे त्याकडे लक्ष वेधले गेले. शैलीच्या दृष्टीने पाहता ही भित्तिचित्रे विविध काळात काढली असावीत.